


Copyright © ghagmaharaj.guru  ghagmaharaj.guru@gmail.com

## Contents

**No table of contents entries found.**

जन्म - मरणाच्या अनंत आवृत्ती होऊन जीवाला मनुष्य जन्म प्राप्त होतो. पण त्या जीवाला अज्ञानामुळे या संसार सागरात निरंतर दुःख भोगावे लागते. त्या दुःखाचा नाश होऊन नित्य चिरकाल सुख प्राप्त होण्यासाठी प्रत्येक संसारी जीव दिवस-रात्र कर्म करत असतो. पण अज्ञानामुळे त्याने केलेल्या कर्माचे फळ काय मिळते? तर एक क्षण सुख आणि अपार दुःखं. सुख - दुःखाने भरलेल्या या संसारात गुरफटून न जाता सुख - दुःख समान मानून परमपूज्य परमात्मा जो सर्व ठिकाणी व्यापून राहिला आहे व जीवाच्या (भक्ताच्या) इच्छेप्रमाणे जो अनेक रूपांनी दर्शन देतो. अशा कृपाळू, दयावंत भगवंताची प्रसन्नता व कृपाशिर्वाद संपादन करून; या संसार सागरातून तारून जीवाला परमसुख, नित्यानंद प्राप्त करून देण्यासाठी साधकाला सद्गुरूची आवश्यकता आहे आणि सद्गुरूच नित्यानंद प्राप्त करून देतात. विश्वातील प्रत्येक जीव तृष्णारूपी चामड्याच्या चिवट दोरांनी बांधला गेला आहे. त्या जीवाची बंधनातून सुटका करून अनादी, अनंत, अमर्याद अशा सर्वेश्वर परमेश्वराच्या दर्शनाचा त्या प्रभुचा साक्षात्कार घडवुन आणण्यासाठी सद्गुरूंची आवश्यकता आहे. उत्तम ज्ञानाने, निष्काम भक्तीने, सद्गुरूंना अनन्य भावाने शरण जावून त्यांच्या उपदेशाचे रहस्य जाणून निष्ठेने त्याचे अनुकरण केले पाहिजे. जीवाला अवर्ण म्हणजे ज्याचे वर्णन करता येत नाही असा, अपार म्हणजे ज्यास अंत नाही असा अतर्क म्हणजे ज्याची कल्पना करता येणार नाही असा; आणि अनुपम म्हणजे ज्याला कोणाचीही उपमा देता येणार नाही, अशी साक्षात्काराची अनुभूती घेता येते. या अनुभूतीने एवढा आनंद प्राप्त होतो की, या संसारातील सर्व भौतिक सुखे एकत्र केली, तरीसुध्दा त्या आनंदाच्या एका बिंदु एवढेही सुख प्रात होणार नाही. हा आनंद जर जीवाला पाहिजे असेल, तर तो आनंद सद्गुरूंच्या अदभूत दिव्य शक्तिमुळेच भक्त - शिष्याला प्राप्त होऊ शकतो. सद्गुरूवाचून आत्मज्ञान प्राप्त होणार नाही.

*सद्गुरूवीण ज्ञान कांहीं / सर्वथा होणार नाही / अज्ञान प्राणी प्रवाहीं / वाहतचि गेले // ज्ञानविरहित जें जें केलें / तें तें जन्मासि मूळ जालें / ह्मणौनि सद्गुरूची पाऊलें / सद्दढ धरावीं //*

*(समर्थ रामदास)*

*गु शब्द स्त्वंधंकरोऽ स्ति / रू शब्द स्तन्निरोधक अंधकारं निरोधित्वासद्गुरूरित्याभिर्धयते //*

*(द्वयोपनिषद - ५)*

*(अद्वयतारोपनिषद - १०)*

गु- म्हणजे अंधकार, रू म्हणजे त्याचा नाश करणारा. गुरू हाच अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करणारा आहे. "सद्गुरूवाचोनी सापडेना सोय" हा एक अभेद्य सिध्दांत आहे तसेच ते त्रिकालाबाधीत सत्यसुध्दा आहे. हे जर जीवाने जाणले तर सद्गुरू चरणाच्या आश्रयाने जीव हा मायारूपी जलाने तुडूंब भरलेला दुस्तर भवसागर तरून जाईल यात कसलीही शंका नाही.

**सद्गुरूंचे भजन:-**

*जयाशीं घडे तोचीं धन्य /*

*सद्गुरूविण समाधान आणिक नाहीं //*

Copyright © ghagmaharaj.guru

**सद्गुरूबद्दल समर्थ रामदासांच्या शब्दात सांगायचे ते असे -**

*जें वेदांसि सांकडे / जें शब्दांसी कानडें /*
*तें संच्छिंष्यासी रोकडें / अलभ्य लाभे //*

*जें योगीयांचे निजवर्म / जें शंकरांचे निजधाम /*
*जें विश्रांतीचे निजविश्राम / परम गुह्य अगाध //*

*ब्राह्मणे पाविजे देबाधिदेवा / तरी किमर्थ सद्गुरु करावा /*
*ऐसें म्हणाल तरी निजठेवा / सद्गुरुविना नाहीं //*

*स्वधर्मकर्मी पूज्य ब्राह्मण / परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण /*
*ब्रह्मज्ञान नस्तां सीण / जन्ममृत्यु चुकेना //*

*सद्गुरुविण ज्ञान कांहीं / सर्वथा होणार नाहीं /*
*अज्ञान प्राणीं प्रवाहीं / वाहतचि गेले //*

*ज्ञानविरहित जें जें केले / तें तें जन्मासि मूळ जालें /*
*ह्मणौनि सद्गुरुची पाऊले / सुदृढ धरावी //*

*जयास वाटे देव पाहावा / तेंणें सत्संग धरावा /*
*सत्संगेविण देवाधिदेवा / पाविजेत नाहीं //*

*नाना साधनें बापुडीं / सद्गुरुविण करिती वेडीं /*
*गुरुकृपेविण कुडकुडीं / वेर्थचि होती //*

*तरी सद्गुरुकृपेविरहित / सर्वथा न घडे स्वहित /*

*यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥*

*जंवनाहीं ज्ञानप्राप्ती । तंव चुकेना यातायाती ।*

*गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ॥*

*सद्‌गुरुविण जन्मनिर्फळ । सद्‌गुरुविण दुःखसकळ ।*

*सद्‌गुरुविण तळमळ । जाणार नाही ॥*

*मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ।*

*तयांसहि ज्ञानविज्ञानविचार । सद्‌गुरुचेनी ॥*

*श्रीरामकृष्ण आदिकरुनी । अति तत्पर गुरुभजनीं ।*

*सिद्ध साधु आणि संतजनी । गुरुदास्य केलें ॥*

*सकळ सृष्टीचे चाळक । हरिहर ब्रह्मादिक ।*

*तेही सद्‌गुरूपदी रंक । महत्त्वा न चढेती ॥*

*(दासबोध दशक ५ समास १)*

या विश्वातील जीवात्म्यांसाठी सद्‌गुरु भक्ती आणि सत्संग याची फार आवश्यकता आहे. आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, रोज सत्संग मिळतो म्हणून सत्संगात राहिलो तरीसुद्धा कर्म बंधनातून मुक्तता होणार नाही. सद्‌गुरुंच्या उपदेशाचे यथायोग्य पालन केले, तरच कर्म बंधनातून आपली सुटका होऊ शकते. सद्‌गुरूंची संगत आणि त्यांनी केलेली उपदेशपर प्रवचने हे नुसते ऐकणे एवढेच पुरेसे नाही, तर सद्‌गुरुंची वचने ऐकल्यानंतर त्यांच्या वचनावर मनःपूर्वक निधीध्यास केला पाहिजे तरच त्यांनी दिलेल्या साधनेत प्रगती होऊ शकेल. लक्षात ठेवा, सद्‌गुरुकडून ऐकलेल्या वचनांचे आपण मनन केले नाही आणि ती वचने कृतीत आणणार नाही तोपर्यंत आपणाला काहीही प्राप्त होणार नाही. परमात्म्याची सगुण उपासना करण्यासाठी जीवाला समकालीन देहधारी सद्‌गुरु जवळ गेले पाहिजे. त्या गुरुचे ध्यान, पूजन केले पाहिजे. कारण गुरु हाच ब्रह्म आहे, गुरु हाच विष्णु आहे, व गुरु हाच महेश आहे. सद्‌गुरु दयामय स्वरूप आहे, तोच अकाल आदिपुरुष होय. या पिंपळरुपी संसारवृक्षाचा बुंधा (मुळे) वरती आहे आणि फांद्या खाली आहे. वेदातील कर्मकांडात जो आकर्षिला जातो तो जीव या संसारूपी वृक्षाच्या सुंदर हिरव्यागार पानाफुलात, फळातच रमत असतो. पंडित तर सांगतात, जर आपल्याला मुळाजवळ जायचे असेल तर आपल्याला शाखांची पूजा केली पाहिजे. आणि त्यांच्या उपदेशाप्रमाणे लोकांनी झाडांच्या शाखाच घट्ट धरुन ठेवल्या आहेत व त्या सोडवायला गेल्या तरी सुटत नाहीत. पंडित लोकांनी सर्वसामान्य लोकांना भ्रमात पाडल्यामुळे लोक अनेक देवःदेवतांची पूजा करु लागले. योगमुद्रा करु लागले. त्यातून त्यांचे मन बाहेर पडतच नाही. त्यामुळे लक्ष-चौऱ्याऐंशी फेऱ्यातून सुटका होत नाही. आणि हयापासून सुटका करुन घेण्यासाठी परमेश्वराच्या सत्य स्वरुपाचा

साक्षात्कार होऊन पावन व्हायचे असेल तर सद्‌गुरुंची प्राप्ती करुन घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने संत, सद्‌गुरूचा शोध घेतला पाहिजे. आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, केवळ ग्रंथ, पोथीचे वाचन करुन परमेश्वराचे सत्य ज्ञान मिळणार नाही, आणि अशा वाचनाने सत्याचे ज्ञान होईल असे कुठेही सांगितले नाही. म्हणून जीवाने संत, सद्‌गुरुंचा शोध घेतला पाहिजे.

*सद्‌गुरु तोची वेदांत / सद्‌गुरु वचन तोची सिद्धांत /*

*सद्‌गुरु वचन तोची धांदात / सप्रचित आतां /*

*असो गुरुचे ठायी अन्यनता /*

*तरी तुझ कांहीसेरे चिंता वेगळेपणे अभक्त / उरेचिना //*

*(सर्मर्थ रामदास-दासबोध)*

पौराणिक वाड्‌मयात निरनिराळ्या गीता आहेत. महान, तत्त्वज्ञान, असलेली व महाज्ञान देणारी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली भग्वदगीता त्याचप्रमाणे शिवगीता, गणेशगीता, रामगीता, श्रीदेवीगीता, कपिलगीता, अष्टावक्रगीता व स्कंदपुराणातील गुरुगीता. जीवाला सर्व बंधनातून मुक्त करुन चिरकाल सुख आणि शांती कोणत्या साधनेत मिळेल असा यक्षप्रश्न प्रत्येक मुमुक्षू जीवाला पडलेला आहे. या प्रश्नाचे निरसन कसे व्हावे? हा प्रश्न गुरुगीतेत भगवान शंकरांची पत्नी पार्वतीने विचारला आहे. श्रुती, स्मृती आणि पुराणे तसेच साधु संतांनीही गुरुची आवश्यकता व महत्त्व जाणले आहे. आपल्या अर्धांगिनी पार्वतीदेवीला श्री शंकरांनी श्रीगुरुचा महिमा गाणारी गुरुगीता सांगितली. भगवान शंकरांनी पार्वतीला असे निश्चित सांगितले की, एका गुरु शिवाय दुसरे ब्रह्म नाही. गुरुतत्त्वाची महती न जाणता इतर कोणतीही साधना केली तरीसुद्धा ती साधना करणारे लोक मूढ असतात. अशा तऱ्हेचे क्रांतीकारक विचार भगवान शंकरांनी प्रारंभीच व्यक्त केले आहेत. जीवाने प्रथम गुरु प्राप्ती व सद्‌गुरुभक्ती दृढ होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**गुरुसेवा कशी करावी?**

गुरुमूर्तिचे ध्यान, गुरुचे नाम, गुरुंनी दिलेल्या मंत्राचा जप आणि आपल्या गुरुपेक्षा इतर कोणत्याही गोष्टीला महत्त्व न देता गुरुची आज्ञा पाळणे, काया, वाचा, मनाने सर्वस्वाचा त्याग करून गुरु सेवा करणे म्हणजेच परब्रह्म सेवा होय. कारण गुरु हाच ब्रह्म आहे, गुरु हाच विष्णू आहे, आणि गुरु हाच महेश आहे. हे तिन्ही देव म्हणजे गुरु - परब्रह्म होय. गुरु हाच सर्व विद्येचा उगम व तारक आहे. गुरु हाच जगत्कारण असून हे सर्व विश्व त्या गुरुच्या आधारे स्थित आहे. जर देवाधिकांचा क्रोध झाला तर तो क्रोध दूर करण्यास सद्‌गुरुच समर्थ आहेत.

भगवान शंकरांनी सद्‌गुरुंची दोन रुपे सांगितली आहेत, एक सगुण आणि दुसरे निर्गुण. या रुपांची शिष्याने गुरु सेवा कशी करावी? त्याची उपासना कशी करावी? हे जसे सांगितले आहे त्याचप्रमाणे निष्ठेने संपूर्ण शरणागती पत्करुन अनन्यभावे भक्ती केली असता गुरु प्रसन्न होऊन गुरुकृपेचा काय परिणाम होतो? गुरुची कृपादृष्टी कशी असते? शिष्याने कसे वागावे? व कसे चिंतन करावे? याचे भगवंतांनी वर्णन करुन शिष्याने ध्यान, पूजन, मंत्र, साधना ह्या सदभावनात्मक दृष्टीने गुरुच्या ठायीच असावे असे सांगितले आहे. पुढे असेही भगवंताने सांगितले आहे की, यंत्र-मंत्र हे सर्व गुरुंच्या ठायीच आहेत. सर्व तीर्थेसुद्धा गुरुंच्या ठिकाणी असून गुरुच्या प्रभावाने सर्व देव कार्य करीत असतात. इतकी महती सद्‌गुरुंची आहे. पुढे भगवंताने गुरुचे ध्यान कसे करावे? व चित्तशुद्धी कशी करावी? गुरुची कधीच निंदा न करता गुरुशी कसे वागावे? कसे बोलावे? आणि गुरुकृपा व त्याचे फळ शाश्वत ब्रह्माचे रुप,

योगमार्गातील संज्ञाचा अर्थ आणि साक्षात्काराचे उत्तम फळ काय मिळते? ते सांगून जी महाफल देणारी गुरुगीता आहे, त्या गुरुगीतेची फलश्रुती सांगितली आहे. जे साधक गुरुसेवा करणारे आहेत त्यांच्या साधनेसाठी कोणती आसने योग्य, कोणती अयोग्य, कोणत्या दिशा योग्य व कोणत्या अयोग्य हे सुद्धा सांगितले आहे. सकाम साधकांना (उपासकांना) कोणते स्थान योग्य, गुरुचे राहण्याचे क्षेत्र, गुरुशिष्याचे महात्म्य आणि गुरु प्रसन्न झाल्यास शिष्याला सिद्धी कशा प्राप्त होतात? याचासुद्धा उल्लेख आहे. गुरुगीतेमध्ये गुरु आणि शिष्य यांची सखोल माहिती व महात्म्याबरोबरच भगवान श्री शंकराने पार्वतीदेवीस अशीही एक सूचना केली आहे, की, "हे देवी, मी जे तुला सांगितले आहे ते रहस्य गुप्त ठेव. कोणाला सांगावे व कोणाला सांगू नये, त्याचप्रमाणे अयोग्य स्थान, अयोग्यकर्म, अयोग्य ध्यान व अयोग्य काल या गोष्टीचा विचार करून ज्याचे अंतःकरण श्रद्धायुक्त आणि भक्तियुक्त असून ज्याचे चित्त दृढ झाले असेल अशाच अधिकारी व्यक्तीला गुरुगीता शिकवावी".

प्रत्येक जीवात परमेश्वर वसलेला आहे. परंतु त्या देहातील परमेश्वराचे ते स्वरुप, ती शक्ती जागृत करण्यासाठी सद्‌गुरुची अत्यंत आवश्यकता असते. सद्‌गुरु हाच परमेश्वराचे दर्शन घडविण्यास, परमेश्वरी अवस्था प्राप्त करुन देण्यास अधिकारयुक्त व्यक्ती असते. देवाधिकांसुद्धा गुरु करण्याची आवश्यकता भासली. मर्यादापुरुषोत्तम रामाला वसिष्ठऋषींना, तसेच संपूर्ण विश्वरूप दाखविणाऱ्या भगवान श्रीकृष्णाला सांदिपनी ऋषींना गुरु करावे लागले होते. अशा सद्‌गुरुचे शिष्यत्व पत्करल्यानंतरच देवदेवतांना परमेश्वरी रुप, स्वरुप, ज्ञान, गुण आणि महत्त्व प्राप्त झाले होते. कारण सद्‌गुरुंच्याच ठिकाणी साक्षात् परब्रह्मचविराजमान असतो. साधकाला परब्रह्माची सगुणोपासना करायची असेल तर देहधारी गुरुची उपासना करणे त्याला आवश्यक आहे.

आपल्या पिंडात ज्याप्रमाणे कुंडलिनी शक्ती वास करते त्याप्रमाणे ब्रह्मांडात महाकुंडलिनी शक्तीचे वास्तव्य आहे. पिंडी ते ब्रह्मांडी या उक्तीप्रमाणे या दोन्ही कुंडलिनी शक्ती आपापली कार्ये करीत असतात. तर ब्रह्माडांत वास्तव्य करणारी महाकुंडलिनी म्हणजे महाविद्‌युतशक्ती. या ब्रह्मांडातील सर्व घडामोडी ज्याप्रमाणे महाकुंडलिनी शक्तीने चालतात, त्याचप्रमाणे शरीरामध्ये असणाऱ्या कुंडलिनी शक्तीनेच शरीरातील सर्व क्रिया चालतात. प्राणी ज्यावेळी जन्माला येतो त्यावेळी आकाशात असणाऱ्या ग्रहांचे परिणाम त्या जीवावर घडून येणार हे जसे ठरलेले असते ही गोष्ट जशी ज्योतिषी सांगतात त्याप्रमाणेच आपल्या शरीरातील कुंडलिनी शक्ती कार्य करते. परंतु ग्रहांच्या अनिष्ट परिणामांचा परिहार आपल्याला करावयाचा असेल किंवा त्या ग्रहांचे जे अनिष्ट परिणाम घडणार असतील, तर त्या परिणामांची प्रतिक्रिया मंत्रशक्तीने साध्य करता येते. प्रत्येक व्यक्ती मंत्रजपाने मंत्रशक्ती उत्पन्न करुन आपणा स्वतःवर येणाऱ्या आगामी आक्रमणाच्या अनिष्ट परिणामांची प्रतिक्रिया मंत्रशक्तीने प्रत्येकाला प्राप्त करुन घेता येते. फल-ज्योतिष शास्त्राने माणसाला भविष्यात येणाऱ्या संकटांची जाणीव होते, तर अद्यनन कर्म करुन प्राक्तन कर्माने उत्पन्न होणाऱ्या संकटांचा परिहार मंत्रशक्तीच्या सहाय्याने करता येतो.

मंत्रोच्चार म्हणजे ध्वनी, ध्वनीपासून गती व गतीपासून ध्वनी. रंग, प्रकाश, उष्णता, आकर्षणशक्ती व विद्‌युतशक्ती ही गतीची रुपांतरे आहेत. योगशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणे ध्वनीला रंग आहे व आकारही आहे. आपल्या मानवी देहात जी षट्‌चक्रे आहेत त्यापैकी अनाहत, विशुद्ध व आज्ञा या चक्रात उत्पन्न होणारे ध्वनी योगशास्त्रात सांगितले आहेत. त्याप्रमाणे ते योग्य आहेत हे पाहूनच मंत्रद्रष्ट्या ऋषींनी इष्ट फळाच्या प्राप्तीसाठी योग्य अशी शक्ती निर्माण होण्यास त्याचे प्रयोग करुनच मंत्राचे निरनिराळे विनियोग त्या ऋषींनी ठरविले. तर अशा तऱ्हेच्या मंत्र पठणाने अतिंद्रिय जगातीलसुद्धा विद्‌युतशक्ती जागृत होऊन आपण प्राप्त केलेल्या शक्तीचा आपल्यालाच काय, पण जनकल्याणासाठीसुद्धा फायदा होऊ शकतो.

तर वर उल्लेख केल्याप्रमाणे या गुरुगीतेतील सर्व श्लोकांनासुद्धा महान मंत्राचे सामर्थ्य आहे. प्रत्येक मंत्राचे उच्चार योग्य व स्पष्ट असावेत. कारण मंत्र उच्चारांचे ध्वनीतरंग (ध्वनी लहरी) वातावरणात पसरत असतात आणि आपल्याला त्यांचे रुप, स्वरुप, रंग जरी दिसत नसले तरी त्यांच्या त्या रुप, स्वरुप व रंगाच्या तरंगांनी संपूर्ण वातावरण शुद्ध होत असते व अशा वातांवरण निर्मितीमुळे सजीवसृष्टीला वाचाशुद्धी व तनशुद्धी होण्यास मदत होते दूरदर्शनवर आपल्याला दिसत असलेली विविधरंगी दृश्ये, ध्वनी, इत्यादी गोष्टी ह्या अशाच प्रकारच्या काही मंत्रांचा परिणाम होय.

म्हणून साधकांनी सुर्चिभूतपणे श्रद्धा, विवेक, ज्ञान-शक्ती, भक्तीयुक्त अंतःकरणाने तन्मय होऊन या गुरुगीतेचे पठण केल्याने त्यांचे इष्ट मनोरथ पूर्ण होतील व पुढे ते मोक्षाचेही अधिकारी होतील, असे वचन प्रत्यक्ष भगवान शंकरांनी दिले आहे; हे गुरुगीता वाचणाऱ्या प्रत्येक साधकाच्या लक्षात आल्याशिवाय रहाणार नाही.

# श्री गुरूचरित्रांतर्गत श्रीगुरुगीता

*श्रीगणेशाय नमः || श्री सरस्वत्यै नमः || श्री गुरूभ्यो नमः ||*

*|| श्री गुरुगीता प्रारंभः ||*

*ॐ अस्य श्रीगुरुगीतास्तोत्रमंत्रस्य भगवान् सदाशिवऋषिः |*
*नानाविधानि छंदांसि | श्रीगुरुपरमात्मा देवता |*
*हं बीजं | सः शक्तिः | क्रो कीलकं |*
*श्रीगुरुप्रसादसिद्धयर्थे जपे विनियोगः ||*

*(अथ करन्यासाः)*

*|| ॐ हं सां सूर्यात्मने अंगुष्ठाभ्यां नमः |*
*ॐ हं सीं सोमात्मने तर्जनीभ्यां नमः |*
*ॐ हं सूं निरंजनात्मने मध्यमाभ्यां नमः |*
*ॐ हं सैं निराभासात्मने अनामिकाभ्यां नमः |*
*ॐ हं सौं अतनुसूक्ष्मात्मने कनिष्ठिकाभ्यां नमः |*
*ॐ हं सः अव्यक्तात्मने करतलकरपपृष्ठाभ्यां नमः |*

*(अथ हृदयादिन्यासाः)*
*ॐ हं सां सूर्यात्मने हृदयाय नमः |*
*ॐ हं सीं सोमात्मने शिरसे स्वाहा |*
*ॐ हं सूं निरंजनात्मने शिखाये वषट् |*
*ॐ हं सैं निराभासात्मने कवचाय हुं |*
*ॐ हं सौं अतनुसूक्ष्मात्मने नेत्रत्रयाय वौषट् |*
*ॐ हं सः अव्यक्तात्मने अस्त्राय फट् |*

***ॐ ब्रह्म भूर्भुवः स्वरोमिति दिग्बन्धः |.***

***(अथ ध्यानं)***

*हंसाभ्यां परिवृत्तपत्रकमलैर्दिव्यैर्जगत्कारणैर्विश्वोत्कीर्णमनेकदेहनिलयैः*

***स्वच्छन्दमात्मेच्छया |***

***तद्योतं पदशांभवं तु चरणं दीपांकुरग्राहिणं,***

***प्रत्यक्षाक्षरविग्रहं गुरुपदं ध्यायेद्विभुं शाश्वतम् || १ ||***

***मम चतुर्विधपुरूषार्थसिद्धयर्थे जपे विनियोगः ||***

**|| अथ श्रीगुरुगीता ||**

***सूत उवाच |***

***कैलासशिखरे रम्ये, भक्तिसंधान-नायकम् |***

***प्रणम्य पार्वती भक्त्या, शंकरं पर्यपृच्छत || १ ||***

सूत म्हणाला - रमणीय कैलास पर्वताच्या शिखरावर भक्तिसाधनांचा उपदेश देणाऱ्यांचा नायक, मुख्य अशा शंकराला पार्वतीने भक्तिभाव-पूर्वक नमस्कार करून विचारले.

***श्रीदेव्युवाच |***

***ॐ नमो देवदेवेश, परात्पर जगद्गुरो |***

***सदाशिव महादेव, गुरुदीक्षां प्रदेहि मे || २||***

पार्वती म्हणाली, "हे देवांच्या देवा, ईश्वरा, सर्वतत्पर जगद्गुरू! हे सदाशिवा, हे महादेवा, तुला नमस्कार असो. मला तू आपली शिष्या मानून गुरुदीक्षा दे.

***केन मार्गेण भो स्वामिन्, देही ब्रह्ममयो भवेत् |***

***त्वं कृपां कुरू मे स्वामिन्, नमामि चरणौ तव || ३||***

हे स्वामी, हे परमेश्वरा कोणत्या साधनांनी कोणत्या मार्गाने हा देहधारी जीव ब्रह्मरूप होईल? हे स्वामी, तुम्ही माझ्यावर कृपा करा, मी आपल्या चरणांना वंदन करते. !'

***ईश्वर उवाच |***

***ममरुपासि देवि त्वं, व्यत्प्रीत्यर्थ वदाम्यहम् |***

***लोकोपकारकः प्रश्नो, न केनापि कृतः पुरा || ४||***

शंकर म्हणाले, "हे देवी, तू माझ्याशी एकरूप आहेस. तुझ्यावर माझी प्रीती, प्रेम, श्रध्दा आहे म्हणून सांगतो. लोकांवर उपकार करणारा असा प्रश्न यापूर्वी कोणीही केला नव्हता. ''

***दुर्लभं त्रिषु लोकेषु, तच्छुणुष्व वदाम्यहम् |***

***गुरुं विना ब्रह्म नान्यत्, सत्यं, सत्यं वरानने || ५ ||***

जे सर्व त्रिलोकांत दुर्लभ असे ज्ञान आहे ते मी तुला सांगतो, तू ऐक. गुरूवेगळे आणखी दुसरे असे ब्रह्म नाहीच, हे सत्य आहे, - सत्यच आहे. (ते त्रिकालाबाधीत सत्य आहे.)

***वेदशास्त्रपुराणानि इतिहासादिकानि च |***

***मंत्रयंत्रादिविद्याश्च, स्मृतिरुच्चाटनादिकम् || ६ ||***

***शैवशाक्तागमादीनि, अन्यानि विविधानि च |***

***अपभ्रंशकराणीह, जीवानां भ्रांतचेतसाम् || ७ ||***

वेद, शास्त्र, पुराण, इतिहास इत्यादी ग्रंथ, तसेच इतर मंत्र, तंत्र, विद्या वगैरे त्याचप्रमाणे स्मृती उच्चाटनादी घोर कृत्ये, शैव, शाक्त आणि वेदादी अनेक ग्रंथ चित्त भ्रमिष्ट झालेल्या जीवांना अधिकच भ्रष्ट करणारे आहेत.

***यज्ञो व्रतं तपो दानं, जपस्तीर्थ तथैव च |***

***गुरुतत्त्वमविज्ञाय, मूढास्ते चरते जनाः || ८ ||***

गुरुतत्त्वाचे ज्ञान प्राप्त करून न घेता मूर्ख लोक यज्ञ, व्रते, तप, दान, जप तसेच तीर्थयात्राही करतात.

***गुरुबुद्ध्यात्मनो नान्यत्, सत्यं सत्यं न संशयः |***

***तल्लाभार्थं प्रयत्नस्तु, कर्तव्यो हि मनीषिभिः || ९ ||***

गुरू ठिकाणी पूज्यभाव ठेवल्याशिवाय अन्य काही खरे नाही, हे सत्य असून, यात काहीच संशय नाही. अशा लाभासाठी मनस्वी माणसांनी आपली कर्तव्य पार पाडावी, तसा प्रयत्न करावा.

***गूढविद्या जगन्माया, देहे चाज्ञानसंभवा |***

***उदयः स्वप्रकाशेन, गुरुशब्देन कथ्यते || १० ||***

जगच्चालिका माया ही अत्यंत गूढ अशी विद्या आहे. देहामध्ये तिचा वास असतो त्याचे जीवाला ज्ञान नसते, पण गुरू या शब्दाने आत्मरूप प्रकाशमान झाले की, तिचाही उदय कसा होतो.? हे कळून चुकते, असे म्हटले आहे.

*सर्वपापविशुद्धात्मा, श्रीगुरोः पादसेवनात् ।*

*देही ब्रह्म भवेद्यस्मात्, तत्कृपार्थं वदामि ते ॥ ११ ॥*

श्रीगुरुंच्या चरणांची सेवा केल्यास देहधारी जीवाची सर्व पापे धुतली जाऊन तो देह विशेष शुध्द असा आत्मा होऊन तो ब्रह्मरूपी होतो, असे ज्यामुळे होते ती गोष्ट मी तुला कृपा करून पूर्णपणे सांगतो.

*गुरुपादांबुजं स्मृत्वा, जलं शिरसि धारयेत् ।*

*सर्वतीर्थावगाहस्य, संप्राप्नोति फलं नरः ॥ १२ ॥*

गुरुचरणरुपी कमलाचे स्मरण करून मनुष्याने आपल्या मस्तकावरून जलस्नान करावे, म्हणजे त्याने सर्व तीर्थक्षेत्री स्नान केल्याचे पुण्य त्यास प्राप्त होते.

*शोषणं पापपङ्कस्य, दीपनं ज्ञानतेजसाम् ।*

*गुरुपादोदकं सम्यक्, संसारार्णवतारकम् ॥ १३ ॥*

गुरुचरणांचे जल पापरूपी चिखल सुकविणारे असे आहे, ज्ञानाचे तेज आणखीन प्रखर करणारे आहे व संसारुपी भवसागरातून सहीसलामत तारून नेणारे आहे.

*अज्ञानमूलहरणं, जन्मकर्मनिवारणं ।*

*ज्ञानवैराग्यसिद्धयर्थं गुरुपादोदकं पिबेत् ॥ १४ ॥*

अज्ञानाचे मूळ नष्ट करणारे, जन्म व कर्म दूर करणारे, असे गुरुचरणांचे जल ज्ञान वैराग्याच्या सिध्दतेसाठी प्राशन करावे.

*गुरोः पादोदकं पीत्वा, गुरोरुच्छिष्टभोजनम् ।*

*गुरुमूर्तेः सदा ध्यानं, गुरुमंत्रं सदा जपेत् ॥ १५ ॥*

गुरुंच्या चरणांचा स्पर्श झालेले जल पिऊन, गुरुंनी अन्नाची चव घेतल्यानंतर उरलेल्या अन्नाचे भोजन करावे व गुरुमूर्तीचे सतत ध्यान करावे आणि गुरुंनी दिलेला मंत्र सतत जपावा.

*काशीक्षेत्रं तन्निवासो, जान्हवी चरणोदकम् ।*

*गुरुरविश्वेश्वरः साक्षात्, तारकं ब्रह्म निश्चितम् ॥ १६॥*

गुरू जेथे रहातात तेच काशीक्षेत्र समजावे, त्याचे चरणस्पर्श झालेले जल हीच गंगा, गुरु हेच साक्षात् काशी विश्वेश्वर व गुरू हेच तारक हेच निश्चित ब्रह्म होय.

*गुरोः पादोदकं यत्तु, गयाऽसौ सौऽक्षयो वटः ।*

*तीर्थराजः प्रयागश्च, गुरुमूर्ते नमो नमः ॥ १७ ॥*

गुरुंचे चर्णजल हीच गया; गुरू हेच अक्षय वटवृक्ष, गुरू हेच श्रेष्ठ असे प्रयागतीर्थ होय! हे गुरुमूर्ते! तुम्हाला नमस्कार!

*गुरुमूर्तिं स्मरेन्नित्यं, गुरुनाम सदा जपेत् ।*

*गुरोराज्ञां प्रकुर्वीत, गुरोरन्यत्र भावयेत्, ॥ १८ ॥*

गुरुंच्या मूर्तीचे नित्य नियमाने ध्यान करावे, गुरुनामाचा सदैव जप करावा, गुरुंची आज्ञा पाळावी; गुरुंशिवाय अन्यत्र कोठेही भाव न ठेवता सर्वत्र एकच गुरुठायी भाव ठेवावा.

*गुरुवक्त्रस्थितं ब्रह्म, प्राप्यते तत्प्रसादतः ।*

*गुरोर्ध्यानं सदा कुर्यात्, कुलस्त्री स्वपतेर्यथा ॥ १९ ॥*

ब्रह्म हे शब्दरूपाने गुरुमुखी रहाते, गुरुंचा आशीर्वाद झाला तर ते आपणांस प्राप्त होते. ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपल्या पतीचेच ध्यान करते तसे आपण उत्कंठतेने गुरुंचे सदैव ध्यान करावे.

*स्वाश्रमं च स्वजातिं च, स्वकीर्तिपुष्टिवर्धनम् ।*

*एतत्सर्व परित्यज्य, गुरोरन्यत्र भावयेत् ॥ २० ॥*

आपला आश्रम, (बह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम किंवा संन्यासाश्रम), स्वतःची जात, आपली कीर्ती, आपले ऐहिक सुख व पोषण वाढविणे, अशा सर्व गोष्टींचा त्याग करून गुरुंशिवाय कोठेही भाव ठेवू नये.

*अनन्याश्चचिन्तयन्तो मां, सुलभं परमं पदम् ।*

*तस्मात्सर्वप्रयत्नेन, गुरोराराधनं कुरू ॥ २१ ॥*

माझे अनन्य चिंतन करणाऱ्यांना सहज परमश्रेष्ठ पद प्राप्त होते, म्हणून माझ्याशी एकरूप अशा गुरूंची सर्वतोपरी प्रयत्नांनी आराधना करा.

*त्रैलोक्यस्फुटवक्तारो, देवाद्यसुरपन्नगाः ।*

*गुरूवक्त्रस्थिता, विद्या गुरुभक्त्यातु लभ्यते ॥ २२ ॥*

त्रिलोकात ज्यांची कीर्ती आहे असे काही श्रेष्ठ देव, असूर व पन्नर स्पष्टवक्ते उपदेशक व वक्ते आहेत, पण जी विद्या गुरुमुखात वास करते ती मात्र गुरुभक्तीनेच प्राप्त होते.

*गुकारस्त्वन्धकारश्च, रुकारस्तेज उच्यते ।*

*अज्ञानग्रासकं ब्रह्म, गुरुरेव न संशयः || २३ ||*

'गुरू' या शदातील 'गु हे अक्षर म्हणजे अंधार (अज्ञान) व 'रू' हे अक्षर म्हणजे प्रकाश (ज्ञान) म्हटले जाते. 'गुरू' हे अज्ञान नाहीसे करणारे ब्रह्म होय यांत कोणतीही शंका नाही.

*गुकारः प्रथमो वर्णो. मायादिगुणभासकः |*

*रुकारो द्वितीयो ब्रह्म, मायाभ्रान्तिविनाशनम् || २४ ||*

'गुरू' या शब्दातील पहिला वर्ण 'गु' हा माया व तिचे गुण (सत्त्व, रज व तम) भासविणारा असून 'रू' हा दुसरा वर्ण, मायेच्या भ्रमाचा विनाश करणारा, ब्रह्म होय.

*एवं गुरुपदं श्रेष्ठं, देवानामपि दुर्लभम्, |*

*हाहाहूहूगणैश्चैव, गन्धर्वेश्च प्रपूज्यते || २५ ||*

असे हे गुरुपद श्रेष्ठ असून ते देवांनाही दुर्लभ आहे. त्याची पूजा हाहा, हूहू इत्यादी गणांकडून व गंधर्वाकडूनही केली जाते.

*ध्रुवं तेषां च सर्वेषां, नास्ति तत्वं गुरोः परम् |*

*आसनं शयनं वस्त्रं, भूषणं वाहनादिकम् || २६ ||*

त्या सर्वांमध्ये गुरुहून दुसरे शाश्वत असे परम तत्त्वच नाही. साधकाने गुरुंना आनंद होईल असे आसन, शय्या, वस्त्र, भूषण, वाहन इत्यादी द्यावे.

*साधकेन प्रदातव्यं, गुरुसंतोषकारकम् |*

*गुरोराराधनं कार्य, स्वजीवित्वं निवेदयेत् || २७ ||*

साधकाने गुरुंना आनंद होईल यासाठी आसन व्यवस्था, शय्या, वस्त्र, भूषण, वाहनांबरोबरच गुरुंचीच आराधना करावी. आपला जीवही त्यांना अर्पण करावा.

*कर्मणा मनसा वाचा, नित्यमाराधयेग्दुरुम् |*

*दीर्घदण्डं नमस्कृत्य, निर्लज्जो गुरूसन्निधौ || २८ ||*

आपले कर्म, मन, वाचा (वाणी) यांनी गुरुंची नेहमी उपासना करावी. गुरुंसमोर कोणतीही लाज न बाळगता त्यांना सरळ साष्टांग नमस्कार करावा.

*शरीरमिन्द्रियं प्राणं, सद्गुरुभ्यो निवेदयेत् |*

*आत्मदारादिकं सर्व, सद्गुरुभ्यो निवेदयेत् || २९ ||*

आपले शरीर, इंद्रिये, प्राण सद्‌गुरूंना अर्पण करावा. त्याबरोबर आपल्या प्राणाबरोबर इतर सर्व गोष्टीही सद्‌गुरूंना अर्पण कराव्यात.

***कृमिकीटभस्मविष्ठा-दुर्गन्धिमलमूत्रकम् |***

***श्लेष्म-रक्तं त्वचा मांसं वंचयेन्न वरानने || ३० ||***

हे सुवदने, आपले शरीर जरी कृमी, कीटक, भस्म, दुर्गंधी विष्ठा, मल, मूत्र, शेंबूड, रक्त, त्वचा व मांस यांचे बनलेले असले तरीही गुरुंना अर्पण केल्याशिवाय राहू नये.

***संसारवृक्षमारूढाःपतन्तो नरकार्णवे |***

***येन चैवोद्‌धृताः सर्वे, तस्मै श्रीगुरवे नमः || ३१ ||***

सर्व लोक संसारूपी वृक्षावर चढून नरक रुपी सागरात पडत असताना जे त्यांना वर काढतात त्या श्रीगुरुंना नमस्कार असो.

***गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुगुरुर्देवो महेश्वरः |***

***गुरुरेव परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः || ३२ ||***

गुरू हेच ब्रह्मदेव आहेत, गुरू हेच विष्णु व गुरू हेच महादेव आहेत, गुरू हेच परब्रह्म आहेत, अशा त्या श्रीगुरुंना नमस्कार असो.

***हेतवे जगतामेब, संसारार्णवसेतवे |***

***प्रभवे सर्वविद्यानां, शंभवे गुरवे नमः || ३३ ||***

सर्व जगाच्या निर्माणकर्त्याला, संसाररूपी सागरावरील सेतूला, सर्व विद्यांच्या प्रभूला व शंभुस्वरूप श्रीगुरुंना नमस्कार असो.

***अज्ञानतिमिरांधस्य, ज्ञानांजनशलाकया |***

***चक्षुरुन्मीलितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः || ३४ ||***

अज्ञानरूपी काळोखाने ज्याला अंधत्व आले आहे, व ज्ञानरुपी अंजन शलाकेने ज्यांनी त्याचे डोळे उघडले त्या श्रीगुरूंना नमस्कार असो

***त्वं पिता त्वं च मे माता, त्वं बंधुस्त्वं च देवता |***

***संसारप्रतिबोधार्थ, तस्मै श्रीगुरवे नमः ||३५ ||***

तूच माझा पिता, तूच माझी माता, तूच भाऊ व तूच देव आहेस. संसाररूपी निद्रेतून जागे करण्यासाठी अशा त्या श्रीगुरुंना माझा नमस्कार असो.

***यत्सत्येन जगत्सत्यं, यत्प्रकाशेन भाति तत् |***

***यदानंदेन नंदंति, तस्मै श्रीगुरवे नमः || ३६||***

जे सत्य आहेत म्हणून जगात सत्य आहे, जे स्वयंप्रकाशित आहेत म्हणून जगात प्रकाश आहे व ज्यांच्या आनंदामुळे सर्व लोक आनंदित होतात, त्या श्रीगुरुंना वंदन असो.

***यस्य स्थित्या सत्यमिदं, यद्भाति भानुरूपतः |***

***प्रियं पुत्रादि यत्प्रीत्या, तसमै श्रीगुरवे नमः || ३७||***

जे आहेत म्हणून हे जग आहे, सर्व काही या सूर्याच्या तेजाने प्रकाशमान होते व ज्यांच्या प्रेमशक्तीमुळे पुत्र व इत्यादी सर्व प्रिय असतात त्या श्रीगुरुंना नमस्कार असो

***येन चेतयते हीदं, चित्तं चेतयते न यम् |***

***जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादी, तस्मै श्रीगुरवे नमः || ३८ ||***

ज्यांनी चेतना दिली तर हे चित्त सचेतन होते, जागृती, स्वप्न व निद्रा या तिन्ही अवस्थांना चित्त सचेतन करीत नसते, पण जे त्यांच्याही पलीकडे आहेत अशा श्रीगुरुंना नमन असो

***यस्य ज्ञानादिदं विश्वं, न दृश्यं भिन्नभेदतः |***

***सदेकरूपरूपाय, तस्मै श्रीगुरवे नमः || ३९ ||***

ज्यांचे ज्ञान प्राप्त झाल्यामुळे हे विश्व भिन्नप्रकारे न दिसता सर्व एकरूपच आहे असे भासते, त्या 'सत्य' स्वरूप, एकरुप अशा श्रीगुरुंना नमस्कार असो.

***यस्यामतं तस्य मतं, मतं यस्य न वेद सः |***

***अनन्यभावभावायं, तस्मै श्रीगुरवे नमः || ४० ||***

आपल्याला काही समजले नाही असे जो म्हणतो त्यालाच समजते व ज्याला समजले असे वाटते त्याला उमजत नाही, असे ज्यांचे अनन्य भावरूप आहे त्या श्रीगुरुंना नमस्कार असो.

***यस्य कारणरूपस्य, कार्यरूपेण भाति यत् |***

***कार्यकारणरूपाय, तस्मै श्रीगुरवे नमः || ४१ ||***

हे जग दिसते ते कार्यरूप आहे, पण ह्या कार्यरुपाला जे कारणीभूत आहेत अशा त्या कार्यकारण श्रीगुरुंना नमस्कार असो.

*नानारूपमिदं सर्व, न केनाप्यस्ति भिन्नता |*

*कार्यकारणता चैव, तस्मै श्रीगुरवे नमः || ४२ ||*

हे सर्व जग बहुरंगी, अनेकरूपी असले तरी त्यात कशाचीही भिन्नता, वेगळेपणा ज्या ठिकाणी भासेनासा होतो व त्यास जे कार्यकारणरुप आहेत, त्या श्रीगुरुंना नमस्कार असो.

*यदंघ्रिकमलद्वंद्वं, द्वंद्वतापनिवारकं |*

*तारकं सर्वदाऽऽपभ्दयः श्रीगुरुं प्रणमाम्यहम् || ४३ ||*

ज्यांचे दोन्ही चरणकमल शीतोष्णादी द्वंद्वांचा ताप निवारण करणारे व सदैव संकटातून तारून नेणारे आहेत अशा त्या श्रीगुरुंना माझा प्रणाम असो.

*शिवे क्रुध्दे गुरुस्त्राता, गुरौ क्रुध्दे शिवो न हि |*

*तस्मात्सर्वप्रयत्नेन, श्रीगुरु शरणं व्रजेत् || ४४ ||*

शंकर आपल्यावर क्रोधित झाले तर गुरु आपले रक्षण करतील. पण गुरु जर क्रोधित झाले तर शंकरही आपले रक्षण करू शकणार नाही. म्हणून सर्व प्रयत्नांनी श्रीगुरुंनाच शरणं जावे.

*वन्दे गुरुपदद्वंद्वं, वाङ्मनश्र्चित्तगोचरं*

*श्वेतरक्तप्रभाभिन्नं, शिवशक्त्यात्मकं परम् || ४५ ||*

वाचा, मन, चित्त व इंद्रिये यांना आकलन होणाऱ्या, शिवतत्त्वाच्या श्वेत व लाल अशा दोन्ही रंगाच्या प्रकाशाने युक्त व त्या वर्णाहून वेगळे असणाऱ्या, शिव आणि शक्ति ह्या दोघांचा जेथे निवास आहे व तद्रुपच जे आहे अशा परमश्रेष्ठ, गुरुंच्या दोन्ही चरण कमलांस मी वंदन करतो.

*गुकारं च गुणातीतं, रुकारं रूपवर्जितम् |*

*गुणातीतस्वरूपं च, यो दद्यात्स गुरुः स्मृतः || ४६ ||*

'गुरु' शब्दातील 'गु' हा वर्ण गुणातीत अवस्था दर्शवितो आणि 'रु' हा वर्ण रुपापलीकडील निराकार अवस्था दर्शवितो, असे जे 'गुरु' गुणातीत असे स्वरुप म्हणजेच आपल्याला जे मोक्ष देतील ते गुरु होय.

*अ-त्रिनेत्रः सर्वसाक्षि, अ-चतुर्बाहुरच्युतः |*

*अ-चतुर्वदनो ब्रह्मा, श्रीगुरुः कथितः प्रिये || ४७ ||*

हे प्रिये (पार्वती), त्रिनेत्र नसलेला पण सर्वसाक्षी असा, चार हात नसणारा पण अच्युत असा, चार मुखे नसणारा पण ब्रह्मा, असा हा श्रीगुरु आहे असे सांगितले आहे.

***अयं मयाल्जलिर्बद्धो, दयासागरवृध्दये |***

***यदनुग्रहतो जन्तुश्चित्रसंसारमुक्तिभाक् || ४८ ||***

ज्याच्या कृपाशिर्वादामुळे हया विचित्र संसारातून जीव मुक्ती प्राप्त करतो त्या कृपारूपी भरती येणाऱ्या दयासागर अशा गुरुला मी हात जोडून नमस्कार करतो.

***श्रीगुरोः परमं रूपं, विवेकचक्षुषोऽमृतम् |***

***मन्दभाग्या न पश्यन्ति, अन्धाः सूर्योदयं यथा || ४९ ||***

विवेकाच्या दृष्टीने पाहाणाऱ्यास श्रीगुरुंचे परमश्रेष्ठ असे रुप अमृतासमान आहे. अंधांना जसा सूर्योदय दिसत नाही त्याप्रमाणे जे दुर्दैवी असतात त्यांना तसे ते रुप दिसत नाही.

***श्रीनाथचरणद्वंद्वं, यस्यां दिशि विराजते |***

***तस्यै दिशे नामसकुर्याद्भक्त्या प्रतिदिनं प्रिये ||५०||***

हे प्रिये, श्रीगुरुनाथांचे दोन्ही चरण ज्या दिशेस असतील त्या दिशेला रोज भक्तिभावाने नमस्कार करावा.

***तस्यै दिशे सततमल्जलिरेष आर्ये,***

***प्रक्षिप्यते मुखरितो मधुपैर्बुधैश्च |***

***जागर्ति यत्र भगवान् गुरुचक्रवर्ती,***

***विश्र्वोदयप्रलयनाटकनित्यसाक्षी || ५१ ||***

हे आर्ये (पार्वती), विश्वाची उत्पत्ती व प्रलय यांच्या नित्य घटना पहाणारा, भगवान चक्रवर्ती गुरु जेथे जागृत असा विराजमान आहे त्या दिशेला, मधमाश्याप्रमाणे आकृष्ट झालेल्या विद्वान जनांची ही बद्धांजली सतत वळत असते.

***श्रीनाथादिगुरुत्रयं गणपतिं पीठत्रयं भैरवं,***

***सिद्धौघं बटुकत्रयं पदयुगं दूतीत्रयं शांभवम् |***

***वीरेशाष्टचतुष्कषष्टिनवकं वीरावलीपञ्चकं,***

***श्रीमन्मालिनिमंत्रराजसहितं वन्दे गुरोर्मण्डलम् || ५२ ||***

देव, क्रषी, देवतादींसमवेत जे गुरुमंडल आहे ज्यांच्याभोवती गणांचा अधिपती गणपती, स्थाने, जाणीव व्यापक होण्याच्या योगभूमिकेतील उड्डियान, जालंधर व मूलाधार ही तीन पीठे आहेत; वामदेव, सनतकुमार व शुक हे तीन बटु आहेत, जीव वे शिव ही योगातील पूर्ण व सिध्द पदे आहेत, शिवदुती, चामुंडा व काली (इडा, पिंगळा व सुषुम्ना) या

शिवकृपारुपी दीक्षा देणाऱ्या तीन दूती आहेत, वीरेश (वीरांचा ईश्वर), आठ सिध्दी, चौसष्ट विद्या, नवग्रह (नवनिधी, नवमातृका, नवनाथ इत्यादी) तसेच ब्रह्मा, विष्णु, महेश, शिव आणि परमशिव हे पाच वीर आहेत आणि श्रीमालिनी स्वरुप श्रेष्ठ असा मंत्रही आहे असे हे मंडल जे तीन गुरुभोवती आहेत म्हणजेच जे त्या मंडलाच्या केंद्रस्थानी आहेत त्या श्रीगुरुदेव, परमगुरु व परात्परगुरू त्रयींना माझा नमस्कार.

***अभ्यस्तैः सकलैः सुदीर्घमानिलैर्व्याधिप्रदैर्दुष्करैः,***

***प्राणायामशतैरनेककरणैर्दुःखात्मकैर्दुर्जयैः।***

***यस्मिन्नभ्युदिते विनश्यति बली वायुः स्वयं तत्क्षणात्,***

***प्राप्तुं तत्सहजं स्वभावमनिशं सेवध्वमेकं गुरुम् ॥ ५३ ॥***

व्याधी उत्पन्न करणाऱ्या व कृतीत. आणावयास अत्यंत: अवघड, दुःखमय, दुर्जय अशा अनेक प्रकारांनी कसेतरी दीर्घ श्वासोच्छश्वास केलेल्या शेकडो प्राणायामांनी उत्थित झालेला, प्रबळ असा देहांतील वायू, ज्या गुरुंच्या उदयाबरोबर क्षणातच आपोआप नष्ट होतो त्या गुरुंचीच सेवा निजबोध होण्यासाठी निरंतर करा.

***स्वदेशिकस्यैव शरीरचिन्तनं,***

***भवेदनन्तस्य शिवस्य चिन्तनम्।***

***स्वदेशिकस्यैव च नामकीर्तनं,***

***भवेदनन्तस्य शिवस्य कीर्तनम् ॥ ५४ ॥***

स्वतःच्या गुरुमूर्तीचे ध्यान केले म्हणजे अनंत अशा: शिवाचे चिंतन होईल, आणि स्वतःच्या गुरुंचे नामसंकीर्तन केले तर त्यानेही अमर्याद अशा शिवाचेच कीर्तन होईल.

***यत्पादरेणुकणिका, कापि संसारवारिधेः।***

***सेतुबंधाय ते नाथं, देशिकं तमुपास्महे ॥ ५५ ॥***

संसारुपी भवसागरांतून तरून जाण्यासाठी ज्यांच्या चरणांच्या धुळीचा एखादा कणही एखादा सेतू असावा असा ठरतो, त्या गुरुंची आम्ही उपासना करतो.

***यस्मादनुग्रहं लब्धवा, महदज्ञानमुत्सृजेत्।***

***तस्मै श्रीदेशिकेंद्राय, नमश्चाभीष्टसिद्धये ॥ ५६ ॥***

ज्यांच्या कृपेचा लाभ झाल्यास सर्व अज्ञान नष्ट होते त्या श्रेष्ठ अशा गुरुंना, माझे चांगले व्हावे म्हणून नमन करतो.

***पादाब्जं सर्वसंसार - दावानलविनाशकं।***

***ब्रह्मरंध्रे सिताम्भोज - मध्यस्थं चन्द्रमण्डले ॥ ५७ ॥***

त्या गुरुंचे चरणकमल माझ्या ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी, शुभ्रकमळामध्ये, चंद्रमंडळात असून ते संसारुपी वणवा नष्ट करणारे आहे.

***अकठादित्रिरेखाब्जे - सहस्त्रदल- मण्डले |***

***हंसपार्श्वत्रिकोणे च, स्मरेत्तन्मध्यगं गुरुम् || ५८ ||***

असे ते चरणकमल अ, क आणि ठ या तीन अक्षरांच्या त्रिकोणरुपी कमळात, सहस्त्रदल- मंडळांत 'हं' व 'स' यांनी युक्त असा त्रिकोण पाठीमागे आहे अशा स्थितीत स्मरावे. त्या सहस्त्रदल मंडलात गुरुचे स्मरण करवे.

***सकलभुवनसृष्टिः कल्पिताशेषपुष्टि-***

***र्निखिलनिगमदृष्टीः संपदांव्यर्थदृष्टिः |***

***अवगुणपरिमार्ष्टीस्तत्पदार्थैकवृष्टि-***

***र्भवगुणपरमेष्टिर्मोक्षमार्गैकदृष्टिः || ५९ ||***

गुरु दृष्टीने सर्व भुवने उत्पन्न केलेली आहेत, तिने सर्व प्रकारची पुष्टी कल्पिलेली आहे. सर्व शास्त्रांची दृष्टी व ती गुरुंची दृष्टी एकच आहे. त्या दृष्टीमुळे इतर सर्व संपत्ती तुच्छ वाटू लागते, ती सर्व दुर्गणांना दूर करते सृष्टीचा उदभव करण्याचे परम सामर्थ्य तिच्या ठिकाणी आहे, ती मोक्ष मार्गावरच दृढ असते.

***सकलभुवनरंगस्थापनास्तंभयष्टिः |***

***सकरुणरसवृष्टिस्तत्वमालासमष्टिः***

***सकलसमयसृष्टिः सच्चिदानंददृष्टि-***

***र्निवसतु मयि नित्यं श्रीगुरोर्दिव्यवृष्टिः || ६० ||***

सर्व त्रैलोक्यादी भुवने हीच रंगभूमी व तिची स्थापना करतांना हया गुरुंच्या दृष्टीचाच स्तंभ म्हणून उपयोग होतो, या दृष्टीतून दयेची, कारुण्याची वृष्टीच होत असते. पंचतत्वांची ही समष्टी म्हणजे संपूर्णताच असून सर्व कालगणना हिच्यातूनच निर्माण झाली, अशी ही सत्, चित् व आनंदरुप गुरुदृष्टी आहे. श्रीगुरुंची दिव्य अशी कृपादृष्टी मजवर नेहमीच असो.

***अग्निशुद्धसमंतात, ज्वालापरिचकाधिया |***

***मंत्रराजमिमं मन्येऽहर्निशं पातु मृत्युतः || ६१ ||***

अग्नीने शुध्द झालेला, सभोवताली ज्वालांनी वेढलेला व तेजस्वी असा हा मंत्रराज आहे. त्याचे मी मनन करतो, तोच माझे मृत्यूपासून रात्रंदिवस रक्षण करो.

***तदेजति तन्नैजति, तद्दूरे तत्समीपके |***

***तदन्तरस्य सर्वस्य, तदु सर्वस्य बाह्यतः: || ६२ ||***

सदर गुरुतत्त्व चल आहे, अचलही आहे. ते दूर असून जवळही आहे. ते सर्वांच्या अंतरंगात आहे व सर्वांच्या बाहेरही आहे.

***अजोऽहमजरोऽहं च, अनादिनिधनः स्वयम् |***

***अविकारश्तिदानन्द, अणीयान्महतो महान् || ६३ ||***

मला जन्म नाही, मला वृध्दत्व नाही, मला आदी व अंत नाही, मी विकारमुक्त् आहे, मी चित् व आनंद आहे, मी अणूसारखा सूक्ष्म व मोठयात मोठाही आहे.

***अपूर्वाणां परं नित्यं, स्वयंज्योतिर्निरामयम् |***

***विरजं परमाकाशं, ध्रुवमानन्दमव्ययम् || ६४ ||***

अपूर्व अशाही गोष्टींच्या पलीकडील अत्यंत नूतन, नित्य, स्वतःच प्रकाशमान होणारे, निरोगी, रजोगुणरहित, परम आकाशरुपी, अनन्य व नित्य आनंदमय आहे.

***श्रुतिः प्रत्यक्षमैतिह्य- मनुमानश्र्चतुष्टयम् |***

***यस्य चात्मतपो वेद, देशिकं च सदा स्मरन् || ६५ ||***

श्रुति, प्रत्यक्ष, इतिहासातील उल्लेख व तर्कानुमान या चार साधनांनी ज्यांचे आत्मतपाचे बल जाणले जाते, त्यांचे मनन करणे योग्य आहे.

***मननं यद्भवं कार्य, तद्वदामि महामते |***

***साधुत्वं च मया दृष्टाव, त्वयि तिष्ठति सांप्रतम् || ६६||***

हे महाबुद्धिमती पार्वती, त्या गुरुंचे महत्त्व तुझ्या ठिकाणी सध्या वसत असलेल्या साधुभावांकडे पाहून मी तुला सांगतो.

***अखण्डमण्डलाकारं, व्याप्तं येन चराचरं |***

***तत्पदं दर्शितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः || ६७ ||***

अखंड मंडलाप्रमाणे असणारे हे सर्व चराचर ज्या गुरुंनी व्यापले आहे आणि ज्यांनी ब्रह्म प्रत्यक्ष दृष्टीत आणून दिले आहे त्या श्रीगुंरुना नमन असो.

***सर्वश्रुतिशिरोरत्न- विराजितपदांबुजः |***

***वेदान्ताम्बुजसूर्यो यस्तस्मै श्रीगुरवे नमः || ६८ ||***

ज्यांचे चरणकमल वेदांतील सर्वश्रेष्ठ वाक्यरत्नांनी सुशोभित आहेत आणि जे (वेदांचे रहस्य उलगडून दाखवतात) स्वतः वेदांतरूपी कमळाला उमलविणारे सूर्यच आहेत, अशा श्रीगुरुंना नमस्कार असो.

*यस्य स्मरणमात्रेण, ज्ञानमुत्पद्यते स्वयम् ।*

*य एव सर्वसंप्राप्तिस्तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६९ ॥*

ज्यांचे नुसते स्मरण केले असता आपल्या बुध्दीत सहजपणे ज्ञान उत्पन्न (प्राप्त) होते व ज्यांना स्वतःलाच सर्व इष्ट गोष्टींची प्राप्ती असते, अशा श्रीगुरुंना वंदन असो.

*चैतन्यं शाश्वतं शांत, व्योमातीतं निरंजनम् ।*

*नादबिंदुकलातीतं, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७० ॥*

जे चैतन्यरुप, शाश्वत शांत, (पंचमहाभूतातील आकाशतत्त्वाच्याही पलीकडील आहेत) निरंतर आहेत व जे (नाद - योगसाधनेत अनुभवास येणाऱ्या सात सूक्ष्म बिंदू) नादबिंदुकलेपलीकडील आहेत अशा त्या श्रीगुरुंना वंदन असो.

*स्थावर जंगमं चैव, तथा चैव चराचरम् ।*

*व्याप्तं येन जगत्सर्वं, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७१ ॥*

ज्यांनी स्थिर व चर, चल व अचल असे असणारे सर्व जगच व्यापून टाकले आहे, अशा श्रीगुरुंना वंदन असो.

*ज्ञानशक्तिसमारूढस्तत्त्वमालाविभूषितः*

*भुक्तिमुक्तिप्रदातायस्, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७२ ॥*

जे ज्ञानरुपी शक्तीवर आरूढ आहेत, ज्यांच्या ठिकाणी पूर्णपणे ज्ञानशक्ती आहे, जे तत्त्वरुपी माळेने अलंकृत झालेले आहेत, जे ऐहिक व पारलौकिक सुख अनुभवायास देतात व मोक्षही देतात, त्या श्रीगुरुंना वंदन असो.

*अनेकजन्मसंप्राप्त - सर्वकर्मविदाहिने ।*

*स्वात्मज्ञानप्रभावेण, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७३ ॥*

जे स्वतःच्या आत्मज्ञानाच्या प्रभावाने आपल्या साधकाने त्याच्या अनेक जन्मात अर्जित केलेले सर्व पूर्वकर्म जाळून टाकतात. अशा त्या श्रीगुरुंना वंदन असो.

*न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः ।*

*तत्त्वं ज्ञानात्परं नास्ति, तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७४ ॥*

गुरुपेक्षा श्रेष्ठ तत्त्व नाही, गुरुसेवेपेक्षा श्रेष्ठ तप नाही गुरुआत्मज्ञानापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे तत्त्व नाही असा ज्यांचा महिमा आहे. अशा श्रीगुरुंना वंदन असो.

*मन्नाथः श्रीजगन्नाथो, मद्गुरुस्त्रिजगद्गुरुः |*

*ममात्मा सर्वभूतात्मा, तस्मै श्रीगुरुवे नमः || ७५ ||*

माझे गुरु हेच सर्व जगाचे नाथ आहेत, माझे गुरु हेच तिन्ही जगाचे गुरु आहेत, ज्यांच्या कृपेने सर्व भूतमात्रांच्या आत्मस्वरुपाशी माझे आत्मस्वरुप एकरुप आहे अशी मला अनुभूती देतात, त्या श्रीगुरुंना माझा नमस्कार असो.

*ध्यानमूलं गुरोमुर्तिः, पूजामूलं गुरोः पदम् |*

*मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोः कृपा || ७६||*

गुरुमूर्ती हे ध्यानाचे सार, गुरुचरण हेच पूजेचे सार, गुरुवचन (गुरुंचा शब्द) हेच मंत्राचे सार व गुरुंची कृपा हेच मोक्षाचे सार होय.

*गुरुरादिरनादिश्च, गुरुः परमदेवतम् |*

*गुरोः परतरं नास्ति, तस्मै श्रीगुरवे नमः || ७७ ||*

गुरु हेच सर्वारंभी आहेत, गुरुंचा प्रारंभ अज्ञात आहे, गुरु हेच परमश्रेष्ठ दैवत आहेत, गुरुंपेक्षा दुसरे श्रेष्ठ असे काहीही नाही, अशा श्रीगुरुंना वंदन असो.

*सप्तसागरपर्यन्त- तीर्थस्नानादिकं फलम् |*

*गुरोरंघ्रिपयोबिंदुसहस्त्रांशे न दुर्लभम् || ७८ ||*

सात सागरांपर्यंत सर्व तीर्थ स्नान केल्याने जेवढे फळ मिळते तेवढे फळ गुरुचरण स्पर्श झालेल्या जलबिंदूंच्या एक सहस्त्र अंशातही सुलभपणे मिळेल.

*हरौ रुष्टे गुरुस्त्राता, गुरौ रुष्टे न कश्चन |*

*तस्मात्सर्वप्रयत्नेन, श्रीगुरु शरणं व्रजेत् || ७९ ||*

श्रीशंकर रुसले, तर गुरु आपले रक्षण करु शकतात पण गुरु रुसले तर आपला कोणीच रक्षणकर्ता नाही, म्हणून सर्व प्रयत्नांनी श्रीगुरुंनाच शरण जावे.

*गुरुरेव जगत्सर्वं, ब्रह्मविष्णुशिवात्मकम् |*

*गुरोः परतरं नास्ति, तस्मात्संपूजयेद् गुरुम् || ८० ||*

गुरु म्हणजेच हे सर्व जगत् अर्थात ब्रह्मा, विष्णु व शिव होय. गुरुपेक्षा श्रेष्ठ असे काही नाही, म्हणून गुरुंचे योग्य पूजन करावे.

*ज्ञानं विज्ञानसहितं, लभ्यते गुरुभक्तितः |*

*गुरोः परतरं नास्ति, ध्येयोऽसौ गुरुमार्गिभिः || ८१ ||*

गुरुभक्ती केल्याने ज्ञान व विज्ञान प्राप्त होते. गुरुपेक्षा श्रेष्ठ काहीही नाही, गुरुपंथाचे अनुकरण करणाऱ्यांनी गुरुंचेच ध्यान करावे.

*यस्मात्परतरं नास्ति, नेति नेतीति वै श्रुतिः |*

*मनसा वचसा चैव, नित्यमाराधयेद् गुरुम् || ८२ ||*

ज्या गुरुपेक्षा दुसरे असे काहीही श्रेष्ठ नाही व वेदही "नाही, असे नाही' असे म्हणून ज्याचे वर्णन करू शकले नाहीत त्या ब्रह्मरूप श्रीगुरुंची मनाने व वाणीनेही नित्य आराधना करावी.

*गुरोः कृपाप्रसादेन, ब्रह्मविष्णुसदाशिवाः |*

*समर्थाः प्रभवादौ च, कैवल्यं गुरुसेवया || ८३ ||*

गुरुंच्याच कृपाप्रसादाने ब्रह्मा, विष्णु व सदाशिव (शंकर) हे सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लय करण्यास समर्थ होतात, आणि ह्या सर्व गोष्टींची प्राप्ती गुरुसेवेमुळेच होते.

*देवकिन्नरगंधर्वाः पितरो यक्षचारणाः|*

*मुनयोऽपि न जानन्ति, गुरुशुश्रूषणे विधिम् || ८४ ||*

देव, किन्नर, गंधर्व, पितर, यक्ष, चारण व मुनी यांनाही गुरुंचे सेवाकार्य कसे करावे? हे समजत नाही.

*महाहंकारगर्भेण, तपोविद्याबलान्विताः |*

*संसारकुहरावर्ते, घटयंत्रे यथा घटाः || ८५ ||*

*न मुक्ता देवगंधर्वाः. पितरो यक्षकिन्नराः |*

*ऋषयः सर्वसिद्धाश्च, गुरुसेवापराङ्मुखाः || ८६ ||*

देव, गंधर्व, पितर, यक्ष, किन्नर, ऋषी व सर्वसिध्दपुरुषांनी; गुरुसेवेपासून तोंड फिरविले तर मोठया अहंकाराने भरुन गेल्यामुळे, तप व विद्या यांचा जोर व अभिमान बाळगण्यामुळे; ते रहाटाच्या लोट्यांप्रमाणे संसाराच्या खोल विहिरीत जन्ममरणाच्या येऱ्याझाऱ्या घालतात व मुक्त होत नाहीत.

*ध्यानं श्रुणु महादेवि, सर्वानंदप्रदायकम् |*

*सर्वसौख्यकरं नित्यं, भुक्तिमुक्तिविधायकम् || ८७ ||*

हे महादेवी, सर्वांना आनंद प्राप्त करून देणारे, सर्वांना नेहमी सौख्य देणारे त्याचप्रमाणे भोग व मुक्ती (मोक्ष) दोन्ही देणारे गुरूध्यान सांगतो ते ऐक.

***श्रीमत् परब्रह्म गुरुं स्मरामि, श्रीमत्परब्रह्म गुरुं वदामि |***

***श्रीमत्परब्रह्म गुरुं नमामि, श्रीमत्परब्रह्म गुरुं भजामि || ८८ ||***

सर्वमहान परब्रह्मस्वरुप अशा गुरुंचे मी स्मरण करतो, त्यांचे नाम घेतो, त्यांना वंदन करतो व त्यांचीच भक्ती करतो.

***ब्रह्मानंद परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति,***

***द्वंदातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् |***

***एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं,***

***भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि || ८९ ||***

ब्रह्मानंदरूपी, अत्यंत सुखमय, केवलस्वरुपी ज्ञानमूर्ती, शीतोष्णादी द्वंद्वांपलीकडील, आकाशासमान स्पष्ट, 'ते तूच आहेस, तूच तत्त्व आहेस' इत्यादी महावाक्यांनी दर्शविले जातात, जे एकमेव नित्य, मलरहित व अचल असून सर्व प्राणीमात्राच्या बुध्दीचे आत्मरूप (साक्षी) आणि अस्तित्व व सत्त्वरजतम या तिन्ही गुणांच्या- पलीकडे आहेत, त्या सद्गुरुंना मी नमस्कार करतो.

***नित्यं शुद्धं निराभासं, निराकारं निरंजनम् |***

***नित्यबोधं चिदानंदं, गुरुं ब्रह्म नमाम्यहम् || ९० ||***

जे नेहमी शुध्द, सत्य, आकाररहित व मलरहित आहेत, जे नेहमी बोध देणारे, चैतन्य व आनंदरूप आहेत, त्या गुरुंना अर्थात ब्रह्माला मी नमस्कार करतो.

***हृदंबुजे कर्णिकमध्यसंस्थे, सिंहासने संस्थितदिव्यमूर्तिम् |***

***ध्यायेद् गुरुं चंद्रकलाप्रकाशं,चित्पुस्तकाभीष्टवरं दधानम् || ९१ ||***

हृदयरुपी कमळाच्या मध्यभागी केसरांमध्ये सिंहासनाधिश झालेल्या, दिव्य देहधारी, शांत आल्हाददायक चंद्रकलेप्रमाणे तेज असणाऱ्या व चित्तस्वरुपी पुस्तक धारण करणाऱ्या व अभिष्ट वरदान हस्त धारण करणाऱ्या श्रीगुंरुचे ध्यान करावे

***श्वेतांबरं श्वेतविलेपपुष्पं,***

***मुक्ताविभूषं मुदितं द्विनेत्रम् |***

***वामांकपीठस्थितदिव्यशक्तिं,***

***मंदस्मितं सांद्रकृपानिधानम् || ९२ ||***

***आनंदमानंदकरं प्रसन्नं,***

***ज्ञानस्वरूपं निजबोधयुक्तम् |***

*योगींद्रमीडयं भवरोगवैद्यं,*

*श्रीमद्‌गुरुं नित्यमहं नमामि || ९३ ||*

शुभ्र वस्त्र, शुभ्र लेप, शुभ्र फुले धारण केलेले, मोती अलंकार धारण केलेले, दोन्ही डोळे प्रसन्न असणारे, दिव्य शक्ती ज्यांच्या डाव्या मांडीवर उपविष्ट आहे असे, मंद स्मित करणारे, दयाधन, सदैव आनंदस्वरुप, आनंदी व प्रसन्न करणारे, ज्ञान हेच ज्यांचे स्वरुप आहे असे आत्मज्ञानयुक्त, योगी लोकांत श्रेष्ठ व पूजनीय, सर्व रोगांवर उपाय करणारे वैद्य, अशा श्रीगुरुंना मी नित्य वंदन करतो.

*यस्मिन्सृष्टिस्थितिध्वंस- निग्रहानुग्रहात्मकम् |*

*कृत्यं पंचविधं शश्वद्भासते तं नमाम्यहम् || ९४ ||*

ज्यांच्या ठिकाणी सृष्टीची ऊत्पती, स्थिती, लय त्याचप्रमाणे कृपा करणे व कृपेला आवर घालणे, ही पाच प्रकारची कार्ये सतत व शाश्वतस्वरुपी दिसतात, त्यांना मी नमस्कार करतो.

*प्रातः शिरसि शुक्लाब्जे, द्विनेत्रं द्विभुजं गुरुम् |*

*वराभययुतं शांतं, स्मरेत्तं नामपूर्वकम् || ९५ ||*

आपल्या शीर्षस्थानी शुभ्रकमलामध्ये दोन डोळे, दोन हात जे एका हाताने अभय व दुसऱ्या हाताने वरदान देतात त्या शांत अशा श्रीगुरुंचे सकाळी-सकाळी स्मरण करावे.

*न गुरोरधिकं न गुरोरधिकं,*

*न गुरोरधिकं न गुरोरधिकम् |*

*शिवशासनत: शिवशासनतः,*

*शिवशासनत: शिवशासनत: || ९६ ||*

गुरुंपेक्षा जास्त श्रेष्ठ असे काहीही नाही, गुरुंपेक्षा जास्त श्रेष्ठ असे काहीही नाही, गुरुंपेक्षा जास्त श्रेष्ठ असे काहीही नाही, गुरुंपेक्षा जास्त श्रेष्ठ असे काहीही नाही अशी शिवाची आज्ञा आहे...आज्ञा आहे... आज्ञा आहे...आज्ञा आहे.

*इदमेव शिवं त्विदमेव शिवं,*

*त्विदमेव शिवं त्विदमेव शिवम् |*

*मम शासनतो मम शासनतो,*

*मम शासनतो मम शासनत: || ९७ ||*

*एवंविधं गुरुं ध्यात्वा, ज्ञानमुत्पद्यते स्वयम् |*

*तत्सद्‌गुरुप्रसादेन, मुक्तोऽहमिति भावयेत् || ९८ ||*

हेच सर्वस्वी कल्याणमय आहे .... कल्याणमय आहे. कल्याणमय आहे.... कल्याणमय आहे अशीच माझी आज्ञा आहे.

असे गुरुंचे विधीपूर्वक ध्यान केल्यास ज्ञान आपणहून उत्पन्न होते. "त्या सद्गुरुंच्या प्रसादाने मी मुक्त आहे" अशी दृढ भावना धरावी.

***गुरुदर्शितमार्गेण, मनःशुद्धिं तु कारयेत् |***

***अनित्यं खंण्डयेत्सर्वं, यत्किंचिदात्मगोचरम् || ९९ ||***

गुरुमाऊलीने दाखविलेल्या मार्गाने मनाची शुध्दी करावी, स्वतःला अनित्य, विनाशी अशा ज्या ज्या गोष्टींचा प्रत्यय येईल त्या त्या सर्व गोष्टींचे खंडन करावे, त्या अनित्य आहेत नित्य नाहीत म्हणून मनानेच दूर लोटांव्यात.

***ज्ञेयं सर्वस्वरूपं च, ज्ञानं च मन उच्यते |***

***ज्ञानं ज्ञेयसमं कुर्यान्, नान्यः पंथा द्वितीयकः || १०० ||***

ज्ञेय हेच सर्वस्व-रूप होय आणि त्याचे ज्ञान हेच मन होय. (आत्मा व गुरू हेच ज्ञेय होय.) ज्ञानरुपी मन हे ज्ञेयरुपी आत्म्याशीं लीन करावे. यापेक्षा (अनन्य) दुसरा मोक्षाचा मार्ग नाही.

***एवं श्रुत्वा महादेवि गुरुनिंदां करोति यः |***

***स याति नरकं घोरं, यावच्चंद्रदिवाकरौ |||| १०१ ||***

हे महादेवी (पार्वती) हें ऐकूनही जो गुरुंची निंदा करतो तो, चंद्र व सूर्य असेपर्यंत धोर अशा नरकाच्या खाईत जातो.

***यावत्कल्पांतको देहस्तावदेव गुरुं स्मरेत् |***

***गुरुलोपो न कर्तव्यः, स्वच्छंदो यदि वा भवेत् || १०२ ||***

कल्पांतापर्यंत हा जो देह आहे तोपर्यंत गुरुंचे स्मरण करावे. आपल्या स्वतःला त्यांच्या लांगलेल्या छंदामुळे आपल्याला आत्मरूप, आत्मज्ञान जंरी प्राप्त झाले तरीही गुरुंचा त्याग करु नये.

***हुंकारेणं न वक्त्व्यं, प्राज्ञः शिष्यैः कथंचन |***

***गुरोरग्रे न वक्त्व्यव्यमसत्यं च कदाचन|| १०३ ||***

समंजस (सूज्ञ) अशा शिष्यांनी गुरुंच्यासमोर कधीही व कोणत्याही प्रकारे 'हूं' असां होकार देऊ नये, व असत्यही बोलू नये. होय किंवा नाही ते स्पष्ट बोलावे.

***गुरुं 'त्व' कृत्य 'हुं' कृत्य, गुरुं निर्जित्य वादतः |***

***अणण्ये निर्जले देशे, स भवेद् ब्रह्मराक्षसः || १०४ ||***

सद्गुरुंना 'तू', 'अरे' असे संबोधणे, त्यांना 'हुं' म्हणून होकार देणे त्यांच्याशी वादविवाद घालून त्यात जिंकणे, या गोष्टी केल्यास असे करणारा मनुष्य निर्जन, निर्मनुष्य जंगलात ब्रह्मराक्षस होऊन राहातो.

*मुनिभिः पन्नगैर्वाऽपि, सुरैर्वा शापितो यदि |*

*कालमृत्युभयाद्वापि, गुरू रक्षति पार्वति || १०५ ||*

मुनींनी, सर्पांनी, देवांनी जरी शाप दिला असेल किंवा मृत्यूचे भय असले तरीही, हे पार्वती, शिष्याचे रक्षण गुरूच् करतात.

*अशक्ता हि सुराद्याश्च, अशक्ता मुनयस्तथा |*

*गुरुशापेन ते शीघ्रं, क्षयं यान्ति न संशयः: || १०६ ||*

गुरूंचा शाप झाला तर देवादिकांसह सर्व मुनींसुध्दा त्यापुढे असमर्थ असून, त्या शापाने ते त्वरित नाश पावतात यात शंका नाही. (ते निःसंशय नाश पावतात.)

*मंत्रराजमिदं देवि, गुरुरित्यक्षरद्वयम् |*

*स्मृतिवदार्थवाक्येन, गुरुः साक्षात्परं पदम् || १०७ ||*

हे देवी, 'गुरू' ही दोन अक्षरच मंत्रांचा राजा आहे. गुरू हेच प्रत्यक्ष परब्रम्ह आहेत असा स्मृतींचा व वेदांचा अभिप्राय आहे.

*श्रुति-स्मृती अविज्ञाय, केवलं गुरुसेवकाः |*

*ते वै संन्यासिनः प्रोक्ता, इतरे वेषधारिणः || १०८ ||*

वेद व स्मृती यांचे कोणतेही ज्ञान नसता केवळ गुरुसेवा करतात तेच खरे संन्यासी, इतर नुसते वेषधारी संन्यासी होय.

*नित्यं ब्रह्म निराकार, निर्गुणं बोधयेत् परम् |*

*सर्वं ब्रह्म निराभासं, दीपो दीपान्तरं यथा || १०९ ||*

नेहमी निराकार, गुणरहित अशा ब्रह्माचा बोध घ्यावा. प्रकाशाच्या बाबतीत एक दिवा जसा दुसऱ्याशी समानधर्मी असतो तसेच, प्रत्यक्ष भासमान झाले नाही तरी ब्रह्मच सर्व आहे.

*गुरोः कृपाप्रसादेन, आत्मारामं निरीक्षयेत् |*

*अनेन गुरुमार्गेण, स्वात्मज्ञानं प्रवर्तते || ११० ||*

गुरुंच्या कृपाप्रसादामुळेच आत्मदर्शनाचा लाभ होतो. अशाचप्रकारे गुरुमार्गानेच आत्मज्ञान लाभते.

*आब्रह्मस्तंबपर्यंत, परमात्मस्वरूपकम् |*

***स्थावरं जंगमं चैव, प्रणमामि जगन्मयम् || १११ ||***

ब्रह्मापासून रेणूपर्यंत व्यापून टाकलेल्या अशा, स्थिर व चर अशा जगत् रूप परमात्मस्वरुपाला मी प्रणाम करतो.

***वंदेऽहं सच्चिदानंद, भेदातीतं सदा गुरुम् |***

***नित्यं पूर्णं निराकारं, निर्गुणं स्वात्मसंस्थितम् || ११२ ||***

सत्, चित् व आनंदमय, भेदांच्या पलीकडील, सदैव पूर्ण, निराकार, गुणरहित व आत्मज्ञानी असणाऱ्या माझ्या गुरुंना मी नेहमी वंदन क्स्तो.

***परात्परतरं ध्येयं, नित्यमानंदकारकम् |***

***हृदयाकाशमध्यस्थं, शुद्धस्फटिकसन्निभम् || ११३ ||***

सदैव आनंदमय, हृदयरुपी आकाशामध्ये शुध्द स्फटिकाप्रमाणे तेजस्वी अशा पराहून पर अशा तत्त्वाचे ध्यान करावे.

***स्फटिकप्रतिमारूपं, दृश्यते दर्पणे यथा |***

***तथात्मनिचिदाकारमानंदं सोऽहमित्युत || ११४ ||***

आरशात स्फटिकाप्रमाणे आपली प्रतिमा जशी स्पष्ट दिसते तसेच सोऽहं भावाचे चित् व आनंदमय असे प्रतिबिंब आत्म्यामध्ये पडते.

***अंगुष्ठमात्रपुरुषं, ध्यायतश्चिन्मयं हृदि |***

***तत्र स्फुरति भावो यः शृणु तं कथयाम्यहम् || ११५ ||***

हृदयात चिन्मय (चेतन) अशा अंगठयाएवढया पुरुषाचे ध्यान करताना जो भाव स्फुरण पावतो तो मी सांगतो, तो तू ऐक.

***अगोचरं तथाऽगम्यं, नामरूपविवर्जितम् |***

***निःशब्दं तद्विजानीयात्, स्वभावं ब्रह्म पार्वती || ११६ ||***

हे पार्वती, ते ब्रह्म स्वतःच्याच अस्तित्वात तेथे असते, पण ते इंद्रियांना समजत नाही, त्याच्याकडे जाता येत नाही, त्याला नाव नाही, रूप नाही, त्याला शब्दसुध्दा नाहीत, असे ते ब्रह्म तू माहिती करून घे.

***यथा गंधः स्वभावेन, कर्पूर कुसुमादिषु |***

***शीतोष्णादिस्वभावेन तथा ब्रह्म च शाश्वतम् || ११७ ||***

कापूर, फुले सारख्या पदार्थांत ज्याप्रमाणे शीतल किंवा उष्ण असा स्वाभाविक सुगंध असतो त्याचप्रमाणेच शाश्वत ब्रह्म स्वभावतःच सर्व ठिकाणी असते.

***स्वयं तथाविधो भूत्वा, स्थातव्यं यत्रकुत्रचित् |***

***कीटभ्रमरवत्तत्र, ध्यानं भवति तादृशम् || ११८ ||***

आपण ब्रह्मरूपच होऊन मनोवांच्छित कोठेही राहावे. सतत भ्रमराचे ध्यान लागल्यामुळे कीटकाचे ज्याप्रमाणे भ्रमरात रुपांतर होते, तसेच ब्रह्मज्ञानही तद्रूप करणारे असते.

***गुरुध्यानं तथा कृत्वा, स्वयं ब्रह्ममयो भवेत् |***

***पिंडे पदे तथा रूपे, मुक्तोऽसौ नात्र संशयः || ११९ ||***

गुरुचे ध्यान केल्यास आपण स्वतः ब्रह्ममय होतो. असा ब्रह्ममय झालेला मनुष्य आणि रुपांमध्ये पिंड, पद, रुपामुळे स्थूल, सुक्ष्म अशा सर्व भूमिकांवर मुक्त होतो यात यत्किंचितही शंका नाही.

***पार्वत्युवाच-***

***पिण्डं किंतु महादेव, पदं किं समुदाहृतम् |***

***रूपातीतं च रूपं किं, एतदाख्याहि शंकर || १२० ||***

पार्वती म्हणाली, हे महादेवा, पिंड म्हणजे काय? पद म्हणजे काय? रुपातीत व रुप म्हणजे काय? ते आपण मला सांगावे.

***श्रीमहादेव उवाच-***

***'पिण्ड' कुण्डलिनी शक्तिः, 'पदं' हंसमुदाहृतम् |***

***रूपं' बिंदुरिति ज्ञेयं, रूपातीतं' निरंजनम् || १२१ ||***

श्रीमहादेव म्हणाले, पिंड म्हणजे कुंडलिनी शक्ती, ' हं ' व ' सः ' हे वर्ण म्हणजे पद, रूप म्हणजे शरीरस्थ तेजाचा बिंदू आणि अंजनरहीत ब्रह्म म्हणजे रुपातीत होय.

***पिण्डे मुक्ताः पदे मुक्ता, रूपे मुक्ता वरानने |***

***रूपातीते तु ये मुक्तास्ते मुक्ता नात्र संशयः || १२२ ||***

हे सुमुखी, पार्वती, काहीजण कुंडलिनी जागृत केलेले असतात, काही ' हं ' ' सः ' या पदापलीकडे गेलेले असतात, काही पूर्ण ब्रह्मचारी असतात, पण या मुक्तीश्रेणीपेक्षा जे ब्रह्मरुपच झालेले असतात तेच खरे मुक्त यात काहीही शंका नाही.

***स्वयं सर्वमयो भूत्वा, परं तत्त्वं विलोकयेत् |***

***परात्परतरं नान्यत्, सर्वमेतन्निरालयम् || १२३ ||***

आपण स्वतः सर्वमय व्हावे व मग त्याच्याही पलीकडे असणारे तत्त्व पहावे. परमतत्त्वापलीकडे काहीही नाही. बाकी हे सर्व जग सत्याधार नसलेले अनित्य आहे.

***तस्यावलोकनं प्राप्य सर्वसंगविवर्जितम् |***

***एकाकी निःस्पृहः शान्तस्तिष्ठासेत् तत्प्रसादतः || १२४ ||***

सर्वांगी असे त्यांचे दर्शन प्राप्त झाल्यावर आपण एकांतात सर्व इच्छा सोडून (नि:स्पृह), त्याच्या कृपेने शांत बसावे.

***लब्धं वाऽथ न लब्धं वा, स्वल्पं बा बहुलं तथा |***

***निष्कामेनैव भोक्तव्यं, सदा संतुष्टचेतसा || १२५ ||***

भोग्य वस्तू मिळो अथवा न मिळो, थोडी मिळो किंवा जास्त मिळो, आपण त्यात सदैव संतोष मानून

स्वतः स्थितप्रज्ञाप्रमाणे त्या गोष्टींबद्दल कामना, इच्छा न ठेवता भोगावी.

***सर्वज्ञपदमित्याहुर्न्देही सर्वमयो बुधाः |***

***सदानंदः सदा शान्तो, रमते यत्रकुत्रचित् || १२६ ||***

असा देहधारी जीवात्मा सर्वज्ञ व सर्वमय असतो. सदैव आनंदी व शांत असतो आणि असा माणूस जिथे.

असेल तिथेच आनंदाने रमलेला असतो असे सर्व लोक म्हणतात.

***यत्रैव तिष्ठते सोऽपि, स देशः पुण्यभाजनम् |***

***मुक्तस्य  लक्षणं देवि, तवाग्रे कथितं मया || १२७ ||***

असा मनुष्य जेथे राहातो तो देशही पुण्यवान होय. हे देवी, अशाप्रकारे मुक्तीची लक्षणं मी तुला सांगितली आहेत.

***उपदेशस्तथा देवि, गुरुमार्गेण मुक्तिदः |***

***गुरुभक्तिस्तथा ध्यानं, सकलं तव कीर्तितम् || १२८ ||***

हे देवी, त्याचप्रमाणे गुरुमार्गाने मुक्ती (मोक्ष) देणारा उपदेश, गुरुभक्ती व गुरुंचे ध्यान हे सगळे तुला वर्णन करुन सांगितले आहे.

***अनेन यभ्दवेत्कार्य; तद्वदामि महामते |***

***लोकोपकारकं देवि, लौकिकं तु न भावयेत् || १२९ ||***

हे देवी, यामुळे जे कार्य घडले जाते तेही मी सांगतो. यामुळे 'लोकांवर'खरोखरी उपकार होतात; पण त्याच्या कार्याचा (रुढीप्रमाणे) लौकिक व्यवहारात्मक असतो असे. समजू नये.

***लौकिकात्कर्मणो यान्ति, ज्ञानहीना-भवार्णवम्***

***ज्ञानी तु भावयेत्सर्व, कर्म निष्कर्म यत्कृतम् || १३८ ||***

लौकिक कर्म केल्याने ज्ञानहीन यक्ती संसारसागरात बुडतात; पण जे कर्म केले ते कर्म आपण केलेच नाही असे विचार ज्ञानी माणसाने मनात दृढ करावे.'

***इदं तु भक्तिभावेन, पठते शृणुते यदि |***

***लिखित्वा तत्प्रदातव्यं, दानं दक्षिणयासह || १३१ ||***

हे गुरुगीतारूप स्तोत्र जर भक्तिभावाने म्हटले व ऐकले तर ते फलदायी आहे. हे स्तोत्र लिहून दक्षिणा देऊन दान म्हणून करावे.

***गुरुगीतात्मकं देवि, शुद्धतत्त्वं मयोदितम् |***

***भवव्याधिविनाशार्थ, स्वयमेव जपेत्सदा ||१३२||***

हे देवी, गुरुगीतेच्या रुपाने मी हे शुध्द तत्त्वच सांगितले आहे. संसारातील तापदायक गोष्टी नष्ट करण्यासाठी याचा स्वतःच नियमित जप करावा.

***गुरुगीताक्षरैकं तु, मंत्रराजमिमं जपेत् |***

***अन्ये च विविधा मंत्राः, कलां नार्हति षोडशीम् ||१३३||***

गुरुगीतारुपी एकच अक्षरमय असा श्रेष्ठ मंत्र जपावा. इतर अनेक मंत्र असले तरीही या गुरुगीतेच्या सोळाव्या अंशाचीही ते बरोबरी करु शकणार नाहीत.

***अनंतफलमाप्नोति, गुरुगीताजपेन तु |***

***सर्वपापप्रशमनं, सर्वदारिद्र्यनाशनम् || १३४ ||***

गुरुगीतेच्या जपाने सर्व पापे नष्ट होतात, सर्व प्रकारच्या दरिद्र्याचा नाश होतो व मनुष्याला अनेक प्रकारच्या फल प्राप्ती होतात.

***कालमृत्युभयहरं, सर्वसंकटनाशनम् |***

***यक्षराक्षसभूतानां, चोरव्याघ्रभयापहम् || १३५ ||***

हे गुरुगीतेचे स्तोत्र मृत्युचे भय नाहीसे करणारे, सर्व प्रकारची संकटे नष्ट करणारे, यक्ष, राक्षस, भूतपिशाच्य, चोर, वाघ यांचे भय दूर करणारे आहे.

*महाव्याधिहरं सर्व, विभूतिसिद्धिदं भवेत् |*

*अथवा मोहनं वश्यं, स्वयमेव जपेत्सदा || १३६ ||*

हे गुरुगीतारूप स्तोत्र सर्व प्रकारच्या महाव्याधींचे निर्दालन करणारे, वैभव आणि सिध्दी देणारे होईल; यांत मोहिनी व वशीकरण या शक्तीही आहेत. याचा स्वतः सदैव जप करावा.

*वस्त्रासने च दारिद्रयं पाषाणे रोगसंभवः|*

*मेदिन्यां दुःखमाप्नोति, काष्ठे भवति निष्फलम् ||१३७||*

वस्त्ररूपी आसनावर जप केल्याने दारिद्रय, दगडावर केल्याने रोगाचा जन्म, जमिनीवर (मातीवर) बसून जप केल्यास दुःख मिळते व लाकडावर बसून केल्यास तो जप निष्फळ होतो.

*कृष्णाजिने ज्ञानसिद्धिर्मोक्षश्रीर्व्याघ्रचर्मणि |*

*कुशासने ज्ञानसिद्धिः, सर्वसिद्धिस्तु कंबले || १३८||*

परंतु हरिणाच्या कातडयावर बसूंन जप केल्यास ज्ञानप्राप्ती होते, वाघाच्या कातडयावर बसून जप केल्यास मोक्षरुपी संपत्ती प्राप्त होते.

`कुश' नामक दर्भावर बसून जप केल्यास ज्ञान सिध्द होते आणि घोंगडीवर बसून जप केल्यास सर्व सिद्धी प्राप्त होतात.

*कुशैर्वा दूर्वया देवि, आसने शुभ्रकंबले |*

*उपविश्य ततो देवि, जेपेदेकाग्रमानसः || १३९ ||*

हे देवी, हया गुरुगीतेतील स्तोत्रांचा जप दर्भाच्या, दुर्वांचा आसनावर अथवा पांढऱ्या घोंगडीवर बसून एकाग्र मनाने करावा.

*ध्येयं शुक्लं च शांत्यर्थ, वश्ये रक्तासनं प्रिये |*

*अभिचारे कृष्णवर्ण, पीतवर्ण धनागमे || १४० ||*

शांती प्राप्त करण्यासाठी पांढरे आसन, वशीकरणासाठी लाल रंगाचे आसन, अभिचार कर्मासाठी काळ्या रंगाचे व धनसंपत्ती मिळविण्यासाठी पिवळया रंगाचे आसन वापरावे.

*उत्तरे शांतिकामस्तु, वश्ये पूर्वमुखो जपेत् |*

*दक्षिणे मारणं प्रोक्तं, पश्चिमे च धनागमः ॥ १४१ ॥*

शांती प्राप्त कण्यासाठी उत्तरेस मुख करुन बसावे वशीकरण करण्यासाठी पूर्वेस, मारणप्रयोगासाठी दक्षिणेस व धनसंपत्ती मिळविण्यासाठी पश्चिमेस मुख करुन बसावे.

*नैर्ऋत्यां दर्शनं चैव,*

*आग्नेय्यां कर्षणं चैव वायव्यां शत्रुनाशनम् ।*

*ईशान्यां ज्ञानमेव च ॥ १४२ ॥*

नैऋत्य दिशेला मुख करुन बसल्याने दर्शने (न्याय, वैशेषिक, द्वैत, अद्वैत वगैरे तत्त्वज्ञानाविषयी वेगवेगळया मतांची दर्शने) प्राप्त होतात, आग्नेयेस आकर्षण, वायव्येस शत्रुचा नाश आणि ईशान्येस ज्ञान मिळते.

*मोहनं सर्वभूतानां, बंधमोक्षकरं भवेत् ।*

*देवराजप्रियकरं, सर्वलोकवशं भवेत् ॥ १४३ ॥*

हे गुरुगीतेतील स्तोत्र सर्व प्राणीमात्रांना मोहून टाकणारे, बंधनातून मुक्त करणारे, देवांचा राजा (इंद्र) याला आवडणारे आणि सर्व लोकांना वश करणारे होवो.

*सर्वेषां स्तंभनकरं, गुणानां च विवर्धनम् ।*

*दुष्कर्मनाशनं चैव, सुकर्मसिद्धिदं भवेत् ॥ १४४ ॥*

हे स्तोत्र सर्व लोकांना आश्चर्यचकित करणारे, गुणांचा विकास करणारे, दुष्ट कर्मांचा नायनाट करणारे व सत्य कर्म यशस्वी करणारे होवो.

*असिद्धं साधयेत्कार्य, नवग्रहभयापहम् ।*

*दुःस्वप्ननाशनं चैव, सुस्वप्नफलदायकम् ॥ १४५ ॥*

ज्या कार्यात यश आलेले नसेल अशा कार्यात यशस्वी करणारे, नवग्रहांचे भय दूर करणारे, वाईट स्वप्नांचा नाश करणारे व चांगली स्वप्ने फलदायी ठरो

*सर्वशान्तिकंर नित्यं, तथा वंध्यासुपुत्रदम् ।*

*अवैधव्यकरं स्त्रीणां, सौभाग्यदायकं सदा ॥ १४६ ॥*

नेहमी सर्वांना सर्व प्रकारची शांती देणारे, वांझ स्त्रीला सुंदर पुत्र ग्राप्ती करुन देणारे, स्त्रियांना वैधव्य न येऊ देता सदैव सौभाग्य देणारे होवो.

*आयुरारोग्यमैश्वर्य- पुत्रपौत्रप्रवर्धनम् |*

*अकामतः स्त्री विधवा,*

*जपान्मोक्षमवाप्नुयात् || १४७ ||*

*अवैधव्यं सकामा तु, लभते चान्यजन्मनि |*

*सर्वदुःखभयं विघ्नं,*

*नाशयेच्छापहारकम् || १४८ ||*

आयुष्मान, आरोग्य, ऐश्वर्य, मुलं, नातवडं यांची वाढ करणारे होवो. याचा विधवेने निष्काम बुध्दीने जप केल्यास तिला मोक्षप्राप्ती होवो.

जर तिने मनात इच्छा धरुन ह्या स्तोत्राचा जप केला तर तिला पुढल्या जन्मी वैधव्य येणार नाही. तसेच सर्व दुःख, भय, विघ्ने व शाप यांचा नाश करणारे होवो.

*सर्वबाधाप्रशमनं, धर्मार्थकाममोक्षदम् |*

*यं यं चिंतयते कामं, तं तं प्राप्नोति निशचितम् || १४९ ||*

हे स्तोत्र सर्व प्रकारची पीडा नष्ट करणारे असून धर्म, अर्थ, काम व मोक्ष देणारे आहे. मनुष्य मनामध्ये जी जी इच्छा धरील ती ती इच्छा (काम) या स्तोत्राच्या जपामुळे पूर्ण होईल हे निश्चित आहे.

*कामितस्य कामधेनुः, कल्पनाकल्पपादपः |*

*चिन्तामणिश्चिंतितस्य, सर्वमंगलकारकम् || १५० ||*

जो मनुष्य सकाम असेल त्यास हे गुरुगीता स्तोत्र कामधेनूप्रमाणे आहे, कल्पना पूर्ण करणारा कल्पतरु आहे.

चिंता नष्ट करणारा चिंतामणी आहे व सर्व मंगलकारक आहे.

*मोक्षहेतुर्जपन्नित्यं, मोक्षश्रियवाप्नुयात् |*

*भोगकामो जपेद्यो वै, तस्य कामफलप्रदम् ||१५१||.*

मोक्षप्राप्तीसाठी जो या स्तोत्राचा नित्य जप करील त्यास मोक्ष मिळो व जो भोग प्राप्त व्हावेत म्हणून या स्तोत्राचा जप करील त्याला इच्छित फळ देणारे होवो.

*जपेच्छाक्तश्च सौरश्च, गाणपत्यश्च वैष्णवः |*

*शैवश्च सिद्धिदं देवि, सत्यं सत्यं न संशयः || १५२ ||*

हे देवी, शक्तिभक्त, सूर्योपासक, गणेशभक्त, विष्णूभक्त आणि शिवभक्तांनी या स्तोत्राचा जप करावा, ते त्यांना सिध्दी देईल हे अगदी सत्य आहे, हयात मुळीच संशय नाही.

*अथ काम्यजपे स्थानं, कथयामि वरानने |*

*सागरे वा सरित्तीरऽथबा हरिहरालये || १५३ ||*

या स्तोत्राचा सकाम जप करण्यासाठी कोणते स्थान योग्य ते आता सांगतो. सदर स्तोत्राचा जप समुद्रकिनारी, नदीतीरी, विष्णूच्या किंवा शंकराच्या मंदिरात करावा.

*शक्तिदेवालये गोष्ठे, सर्वदेवालये शुभे |*

*वटे च धात्रीमूले वा, मठे वृंदावने तथा || १५४ ||*

देवीच्या मंदिरात, गोठयात, सर्व शुभ मंदिरात, वडाच्या झाडाच्या किंवा आवळीच्या बुंध्याशी बसून, मठामध्ये त्याचप्रमाणे तुळशीच्या वनात बसून या स्तोत्राचा पाठ करावा.

*पवित्रे निर्मले स्थाने, नित्यानुष्ठानतोऽपि वा |*

*निर्वेदनेन, मौनेन, जपमेतं समाचरेत् || १५५ ||*

दररोजच्या अनुष्ठानासाठी या स्तोत्राचा पाठ पवित्र, निर्मळ, स्वच्छ जागा निवडून करावा. याचा पाठ शांत मनाने, मनातल्या मनातही करावा.

*स्मशाने भयभूमौ तु, वटमूलान्तिके तथा |*

*सिद्धयन्ति धौत्तरे मूले, चूतवृक्षस्य सन्निधौ || १५६ ||*

स्मशानात तसेंच जेथे भीती वाटते अशा जागी, किंवा वडाच्या, धोत्र्याच्या व आम्रवृक्षाच्या मुळाजवळ (बुंध्याजवळ) बसून या स्तोत्राचा जप केला तर या स्तोत्रामुळे सिध्दी प्राप्त होतात.

*गुरुपुत्रो वरं मूर्खस्तस्य सिद्धयन्ति नान्यथा |*

*शुभकर्माणि सर्वाणि, दीक्षाव्रततपांसि च || १५७ ||*

गुरुपुत्र या पदवीस योग्य असा गुरुसेवा करणाऱ्या शिष्यास, व्यवहारात भोळा भाबडा असला तरी त्याची सदर जपाने दीक्षा, व्रत, तप वगैरे कामे सिध्दीस जातात. गुरुंची सेवा न करणाऱ्या इतरांना तसे फळ मिळत नाही.

*संसारमलनाशार्थ, भवपाशनिवृत्तये |*

*गुरुगीतांभसि स्नानं, तत्त्वज्ञः कुरुते सदा || १५८ ||*

संसारातील पिडा (मल) नष्ट व्हावी व संसाराचे पाश दूर व्हावेत म्हणून तत्त्व जाणणारा शहाणा माणूस या गुरुगीतारुपी जलामध्ये स्नान करतो.

*स एव च गुरुः साक्षात्, सदा सद्ब्रह्मवित्तमः |*

***तस्य स्थानानि सर्वाणि, पवित्राणि न संशयः ||१५९||***

जो नेहमी ब्रह्मज्ञानाने पूर्णायुक्त असतो तोच साक्षात गुरु होय. तो राहातो ती सर्व स्थाने पवित्र असतात यात मुळीच शंका नाही.

***सर्वशुद्धः पवित्रोऽसौ, स्वभावाद्यत्र तिष्ठति |***

***तत्र देवगणाः सर्वे, क्षेत्रे पीठे वसन्ति हि|| १६० ||***

सर्वतोपरी शुध्द व पवित्र असा गुरू स्वाभाविकपणे ज्या क्षेत्रात किंवा ज्या पिठस्थानी राहातो तेथे अर्थात सर्व देवगण निवास करतात.

***आसनस्थः शयानो वा, गच्छँस्तिष्ठन् वदन्नपि |***

***अश्वारूढो गजारूढः, सुप्तो वा जागृतोऽपि वा ||१६१||***

***शुचिष्मांश्च सदा ज्ञानी, गुरुगीताजपेन तु |***

***तस्य दर्शनमात्रेण, पुनर्जन्म न विद्यते || १६२ ||***

गुरुगीतेचा जप करणारा शुध्द आचरणाचा ज्ञानी मनुष्य बसलेला असो, चालत असो, उभा असो, बोलत असो, घोडयावर किंवा हत्तीवर स्वार झालेला असो, झोपलेला असो अथवा जागृत असो; त्याच्या नुसत्या दर्शनानेही मनुष्याचा पुर्नजन्म टळतो.

***समुद्रे च यथा तोयं, क्षीरे क्षीरं घृते घृतं |***

***भिन्ने कुंभे यथाकाश-स्तथात्मा परमात्मनि || १६३ ||***

***तथैव ज्ञानी जीवात्मा, परमात्मनि लीयते |***

***ऐक्येन रमते ज्ञानी, यत्र तत्र दिवानिशम् || १६४ ||***

सागरात पाणी जसे एकरूप होते, दूध दुधात व तूप तुपात मिसळले जाते तसे वेगळे भासणारे आकाशासारखे आत्मे मुळात परमात्म्याशी एकरुप झालेले असतात.

त्याचप्रमाणे आत्मज्ञानी जीवात्मा परमात्म्यात विलीन असून तो जेथे कोठे असेल तेथे अहोरात्र आनंदात असतो.

***एवंविधो महामुक्तः, सर्वदा वर्तते बुधः |***

***तस्य सर्वप्रयत्नेन, भावभक्तिं करोति यः || १६५ ||***

***सर्वसंदेहरहितो, मुक्तो भवति पार्वति |***

***भुक्तिमुक्तिद्वयं तस्य, जिव्हाग्रे च सरस्वती || १६६ ||***

हे पार्वती, अत्यंत मुक्त असणारा अशाप्रकारचा ज्ञानी मनुष्य सदैव वर्तमान (सांप्रत) असतो. त्या महात्म्याची जो सर्व प्रयत्नांनी सदभावनेने भक्ती करील तो सर्व संशयातून मुक्त होईल व भोग आणि मोक्ष हया दोन्ही गोष्टी त्याच्यासाठी सहजसुलभ असतील, त्याच्या जिभेवर सरस्वतीचा वास असेल.

*अनेन प्राणिनः सर्वे, गुरुगीताजपेन तु ।*

*सर्वसिध्दिं प्राप्नुवन्ति, भुक्तिं मुक्तिं न संशयः ।।१६७।।*

ह्या गुरुगीतेच्या जपाने सर्व लोक सगळया सिद्धी, भोग व मोक्ष प्राप्त करतील यात शंका (संशय) नाही.

*सत्यं सत्यं पुनः सत्यं, धर्म सांख्यं मयोदितं ।*

*गुरुगीतासमं नास्ति, सत्यं सत्यं वरानने ।। १६८ ।।*

गुरुगीतेसमान दुसरे काहीही नाही हे सत्य मी दुसऱ्यांदा सांगत आहे. मी हा सांख्यधर्म प्रगट केला आहे, हे ही त्रिवार सत्य आहे.

*एको देव एकधर्म, एकनिष्ठा परंतपः ।*

*गुरोः परतरं नान्यन्नास्ति तत्त्वं गुरोः परम् ।। १६९ ।।*

*माता धन्या पिता धन्यो, धन्यो वंशः कुल तथा ।*

*धन्या च वसुधा देवि, गुरुभक्तिः सुदुर्लभा ।। १७० ।।*

गुरू हाच एकमेव देव, एकमेव धर्म, एकमेव निष्ठा व हेच उत्तम तप होय. गुरुपेक्षा अन्य असे काहीही श्रेष्ठ नाही, गुरुपेक्षा दुसरे तत्त्व श्रेष्ठ नाही. असा गुरू ज्या वंशात जन्माला आला तो वंश, ते कुळ, त्याची माता, त्याचे पिता हे सर्व धन्य होय. हे देवी (पार्वती) त्यामुळे ही वसुधा (पृथ्वी) ही धन्य होय. गुरुभक्ति ही अत्यंत दुर्लभ (दुर्मिळ) आहे.

*शरीरमिंद्रियं प्राणश्चार्थः स्वजन बांधवाः ।*

*माता पिता कुलं देवि, गुरुरेव न संशयः ।। १७१ ।।*

हे देवी, गुरु हाच शरीर, इंद्रिये, प्राण, पुरुषार्थ, सगेसोयरे, भाऊ, आई, वडील, कूळ हे सर्व काही तोच आहे यांत मुळीच शंका नाही.

*आकल्पं जन्मना कोट्या, जपव्रततपःक्रियाः।*

*तत्सर्व सफलं देवि, गुरुसंतोषमात्रतः ।। १७२ ।।*

हे देवी, मानवाने कोटयान् कोटी जन्मात केलेला जप, व्रते, तप व कर्माची सफलश्रुती केवळ गुरू संतुष्ट झाला तरच होते.

***विद्यातपोबलेनैव, मंदभाग्याश्च ये नराः |***

***गुरुसेवां न कुर्वन्ति, सत्यं सत्यं वरानने || १७३ ||***

विद्येच्या व तपाच्या बळाचे गर्व करणारे जे दुर्देवी लोक असतात, तेच गुरुसेवा करीत नाहीत हेच खरे सत्य आहे.

***ब्रह्मविष्णुमहेशाश्च, देवर्षिपितृकिंकिन्नराः |***

***सिद्धचारणयक्षाश्च, अन्येऽपि मुनयो जनाः || १७४ ||***

ब्रह्म, विष्णु, महेश, देवर्षी, पितर, किन्नर, सिध्द, चारण, यक्ष व इतर मुनी आणि मनुष्य यांचीही अशीच स्थिती आहे.

***गुरुभावः परं तीर्थमन्यतीर्थं निरर्थकम् |***

***सर्वतीर्थाश्रयं देवि, पादाङ्गुष्टं च वर्तते || १७५ ||***

हे देवी, गुरू ठिकाणी श्रध्दा ठेवणे हेच सर्वोच्च तीर्थ होय, इतर तीर्थ निरर्थक होय. गुरुंच्या आंगठयाशीच सर्व तीर्थे असतात.

***जपेन जयमाप्नोति, चानंतफलमाप्नुयात् |***

***हीनकर्म त्यजन्सर्व, स्थानानि चाधमानि च || १७६||***

सर्व वाईट कामांचा व सगळ्या वाईट मार्गांचा त्याग केल्यास व या स्तोत्राचा मनोभावे जप केल्यास जप करणारा विजय, अमर्याद फल प्राप्त करतो.

***उग्रध्यानं कुक्कुटस्थं, हीनकर्मफलप्रदं |***

***गुरुगीतां प्रयाणे वा, संग्रामे रिपुसंकटे || १७७ ||***

***जपते जयमाप्नोति, मरणे मुक्तिदायकम् |***

***सर्वकर्म च सर्वत्र, गुरुपुत्रस्य सिद्धयति || १७८ ||***

कुक्कुट (कोंबडा) वाहन असणाऱ्या देवतांचे ध्यान उग्र असते असे ध्यान करणे सोडून द्यावे. हीन कर्माचे फळ हीनच असते. प्रवासाला निघताना, युध्दाच्या सुरुवातीलां किंवा शत्रुचे संकट आल्यास गुरुगीतेचा पाठ करावा. (गुरुगीतेचे वाचन करावे.)

म्हणजे रणांगणात जय मिळेल, रणांगणात मृत्यु आल्यास मोक्षप्राप्ती मिळेल (मोक्षदायक ठरेल). गुरुपुत्राचे (गुरुसेवकाचे) गुरुगीतेच्या पठणाने सगळी कार्ये सर्वत्र यशस्वी होतील.

***इदं रहस्यं नो वाच्यं, तवाग्रे कथितं मया |***

***सुगोप्यं च प्रयत्नेन, मम त्वं च प्रियात्विति || १७९ ||***

तू मला प्रिय आहेस म्हणूनच हे गुप्त असे रहस्य मी तुला सांगितले, पण हे सर्वतोपरी गुप्तच ठेव, कोणालाही सांगू नकोस.

***स्वामिमुख्यगणेशादि विष्णवादीनां च पार्वति |***

***मनसापि न वक्तव्यं, सत्यं सत्यं वदाम्यहम् || १८० ||***

हे पार्वती, मी वारंवार बजावून सांगतो की, कार्तिकस्वामी, गणेश, विष्णू इत्यादी देवतांनाही हे सांगण्याचे मनात देखील आणू नकोस.

***अतीवपक्वचित्ताय, श्रद्धाभक्तियुताय च |***

***प्रवक्तव्यमिदं देवि, ममात्माऽसि सदा प्रिये || १८१ ||***

हे देवी, ज्याचे चित्त विवेकादी साधनांनी अत्यंत परिपक्व झाले आहे, जो श्रध्दा आणि भक्तियुक्त असा आहे त्यालाच फक्त हे सांगावे. (तू आणि मी एकच आहोत व तू मला नेहमीच प्रिय आहेस म्हणून मी तुला हे सांगितले आहे.)

***अभक्ते वंचके धूर्ते, पाखण्डे नास्तिके नरे |***

***मनसापि न वक्तव्या, गुरुगीता कदाचन || १८२ ||***

ज्याला भक्तीचा लवलेष नाही, जो फसविणारा, धूर्त, पाखंडी आहे आणि ईश्वरावर श्रध्दा नसलेला असा मनुष्य आहे त्याला मनानेही ही गुरुगीता कधीही सांगू नये.


***इति श्रीस्कंदपुराणे उत्तरखण्डे***

***ईश्वरपार्वतीसंवादे गुरुगीता समाप्ता |***

श्रीस्कंदपुराणातील उत्तरखंडातील भगवान शंकर व पार्वतीच्या संवादातील गुरुगीता समाप्त झाली.

***श्रीगुरुदेवदत्तात्रेयार्पणमस्तु ||***

श्री गुरुदेव दत्तात्रयांना अर्पण असो.


ॐ
मेष
वृषभ
मीन
कुंभ
मकर
रवि
केतु
राहु